म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २१७८
जीवन विकास
नं ७३५
जीवनविकास
७३५
स.नं. ७३५
REFBK-0006136

ज्यांनीं मला अनेक
प्रश्न विचारून,
चर्चा करून,
शंका काढून,
हें लेखन करायला उद्युक्त केलें,
त्या माझ्या
प्रिय विद्यार्थ्यांस,
समर्पण.

ल. नी. छ

क्र. नं. ४३४ शि. ७३८
६९३६९
REFBK-0006136

# प्रस्तावना

हल्लींच्या क्रान्तिगर्भकाळीं प्रत्येक विद्यालयाच्या प्राङ्गणांत नि विद्यार्थ्यांच्या अन्त:करणांत अनेक नवविचारांचे पडसाद प्रत्यहीं उठत असतात. कित्येक शिक्षक यामुळें भांबावून जाऊन हे सारे साद नाहींसे करण्यासाठीं विद्यालयांच्या दारांखिडक्यांवर प्रश्नपत्रिका डकवून ठेवतात, सभोंवतीं पाठ्यपुस्तकांचे प्रचंड तट रचतात आणि भिंतींवर नि मुलांच्या कानांवर सनावळ्या, कोष्टकें नि सुभाषितें यांचा जाड लेप चढवितात. अर्थात् या सर्व उद्योगांमुळें विद्यालयीन वातावरण अधिकच दूषित होतें. त्यांत विद्यार्थ्यांचा अधिकच कोंडमारा होऊं लागतो आणि ताज्या हवेकरतां उघड्या मैदानावर पळून जाण्याचा त्यांचा नेहमींचा मोह साहजिकच अनिवार होतो. नव्या विचाराचे अग्रगामी शिक्षक या बाबतींत निराळेंच धोरण स्वीकारतात. ते उघड्या कानांनीं ह्या सर्व पडसादांचें स्वागत करतात, एवढेंच नव्हे तर त्यांच्या तालसुरांचा योग्य परिचय करून घेण्यास आपल्या विद्यार्थ्यांना साहाय्य करतात. यामुळें विद्यार्थ्यांच्या विविध आशा-आकांक्षा, त्यांची परिस्थिति, या परिस्थितीच्या आघातामुळें त्यांच्या मनांत उत्पन्न होणारे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न आणि शाळेतील अभ्यास नि जीवन यांच्यामध्यें योग्य तो सुसंवाद निर्माण होतो. त्यांना असें उमजूं लागतें कीं शिक्षण ही एक खऱ्या जीवनाहून अलग अशी कृत्रिम, त्रुटित नि व्यर्थ अशी चळवळ नसून आपल्या नैसर्गिक विकासाला प्रमाण अन् डौल आणणारी, आपल्या जीविताला खरोखरच वळण लावणारी आणि व्यापक जीवनावर मार्गदर्शक प्रकाश टाकणारी एक शक्ति आहे. अशाच कांहींशा धोरणानें जळगांवचे एक विद्वान् नामांकित शिक्षक श्री. छापेकर यांनी गतवर्षी आपल्या हायस्कूलमध्यें एक उपक्रम केला होता. निरनिराळे प्रसंग साधून, विविध क्षेत्रांतील विचारप्रभूंच्या भांडारांतून एकेक तेजस्वी विचार-रत्न ते निवडून काढीत, आणि दर आठवड्यास त्याला आपल्या विवेचनाच्या सुबक कोंदणांत बसवून विद्यालयाच्या प्रदर्शिकेमध्यें माण्डीत असत. अशा रीतीनें सहज गुम्फलेली ही रत्नमाला त्यांनीं आतां अखिल विद्यार्थीवृंदास सादर केली आहे.

आज आपल्या विद्यामंदिरांतून परीक्षादेवीची उपासना जोरानें सुरूं आहे. तिचे उपाध्याय नि उपासक आपल्या जीर्ण पोथ्यांतील मंत्रांच्या नि आरत्यांच्या पलीकडे पाहूं शकत नाहींत यांत आश्चर्य नाहीं. पण फलाबद्दल निराश झालेल्या अनेक पालकांना या खटाटोपाचा साहजिकच वीट आला आहे. त्यांना वाटूं लागलें आहे कीं या सर्व विद्यामंदिरांचा विध्वंस करून नवी उद्योगभवनें सर्वत्र स्थापावींत आणि तेथें तरी आपल्या मुलांना कांहीं उपयुक्त शिक्षण देऊन त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटतो का तें पाहावें. हा विचार रास्तच आहे. पण सर्वांनीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं केवळ परीक्षेऐवजीं पोटोबाचें ध्यान सुरूं करून शिक्षणाचें व्यापक व मौलिक कार्य होणार नाहीं. शिक्षण विद्यालयांत होवो अगर कारखान्यांत, त्याचें ध्येय केवळ पुस्तकी विद्येइतकें अगर पोटभरू कलेइतकें मर्यादित होणें अत्यंत हानिकारक होय. कारण आज शिक्षणसंस्थेवर सर्वांत मोठी जबाबदारी कोणती असेल तर ती स्वतंत्र भारताच्या भावी लोकशाहीचे आदर्श नागरिक तयार करण्याची. आपआपलें कर्तव्य ओळखून, कोणत्याही आपमतलबी प्रचारास बळी न पडतां, स्वतंत्रबुद्धीनें सारासार विचार करण्याची पात्रता असलेले, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें विविध बाबतींत महत्त्वाचे निर्णय घेण्याला लागणारें धैर्य नि तारतम्य अंगीं असणारे शीलवान् नागरिक इतःपर ज्या प्रमाणांत आपल्या देशाला लाभतील त्या प्रमाणांतच आपण वैभवसंपन्न व सुखी होऊं. याकरतां आमची नि आमच्या विद्यार्थ्यांची दृष्टि उन्नत आणि व्यापक होईल, बुद्धि अधिक जागृत आणि समतोल होईल आणि वृत्ति अधिक त्यागी नि सेवाशील होईल अशा शिक्षणाची योजना करणें आमचें आद्यकर्तव्य आहे. शाळेच्या अभ्यासांतून आणि अवांतर वाचनामधून अशा प्रकारचें आध्यात्मिक शिक्षण थोडेंफार मिळूं शकत नाहीं असें नाहीं. पण आमच्या विचित्र शिक्षणपद्धतींत अनेक दुय्यम गोष्टींचें फाजील स्तोम माजल्यामुळें, आत्मविकासाला प्रेरक व पोषक अशा या कार्याला अगदीं गौण स्थान प्राप्त झालें आहे. श्री. छापेकरांच्या उपक्रमाचें महत्त्व हेंच कीं विद्यार्थ्यांच्या विकासाकडे नि विचारजागृतीकडे स्वतंत्ररीत्या, पद्धतशीरपणें कांहीं अग्राडीचे शिक्षक तरी लक्ष देऊं लागले आहेत ह्याचें तें एक सुचिन्ह आहे.

सं. निबंध ७३५



प्रस्तुत पुस्तकांत स्वातंत्र्य, कर्तव्य, प्रेम, वाङमय, लोकशाही, युद्ध, इत्यादि (विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर असलेल्या) अनेक प्रश्नांवर प्रकाश टाकणारीं निवडक वचनें लेखकानें संकलित केलीं आहेत. तत्त्वज्ञान, काव्य, कादंबरी, राष्ट्रसेवा या सारख्या विविध क्षेत्रांत चमकणाऱ्या जगप्रसिद्ध विभूतींच्या या वैचित्र्यपूर्ण वचनसंग्रहावर त्यांनीं अगदीं त्रोटक पण स्पष्ट अन् चटकदार भाष्य केलें आहे. मूळ लेखक हिंदी, चिनी, रशिअन, जर्मन, इंग्रजी अथवा अमेरिकन असल्यामुळें त्यांचीं वचनें इंग्रजी भाषेंतूनच द्यावीं लागलीं आहेत त्यास उपाय नाहीं. पण विद्यार्थ्यांच्या माहिती-करतां या सर्व लेखकांचा त्रोटक परिचय नि उधृत केलेल्या वचनांचा बरोबर संदर्भ पुस्तकांत शेवटीं दिला असता तर पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडली असती. अर्थात् ह्यामुळें पुस्तकाच्या मूळ उद्देशाच्या दृष्टीनें कांहीं वैगुण्य आलें असें नाहीं. लेखकाचें सर्व विवेचन, क्वचित् कांहीं स्थलें सोडल्यास, सुबोध आणि निर्दोषच आहे. तें वाचल्यानंतर त्यांनीं आणखी लिहावें असेंच कोणालाही वाटेल. 'दुःखाची देणगी' (क्रमांक १६), 'कृतीचें मूल्यमापन' (क्र. २१), 'ही असंतुष्टता चालेल (क्र. १९), 'नशीबावर हवाला नको' (क्र. १५) इत्यादिकांमध्यें त्यांची कला चांगली दिसून येते. हे एकपानी लघुतम निबंध पाहून मला वर्षा-ऋतूंत डोंगरसपाटीवर उगवणाऱ्या एक प्रकारच्या आर्किडजातीच्या रानफुलांची आठवण होते. जमिनीला डसलेलें एकच सफई लंबगोल हिरवेंगार पान, त्यांतून उगवलेला एक कोंवळा चारबोटी देंठ, आणि त्याच्या शेंड्यावर लटकलेलें एक लहानसें पांढरेंशुभ्र सुन्दर फूल ! त्याप्रमाणें येथेंही एखादा प्रसंग अगर दृश्य, त्यांतूनच उभारलेली एखादी कल्पना आणि शेवटीं एखादें विचारपुष्प नि त्याच्या सुगंधलहरी एवढी खुलावट चार छोट्या परिच्छेदांत झालेली दिसेल.

प्रत्येक निबंधाच्या शेवटीं दिलेला अभ्यास हाही एक या पुस्तकाचा महत्त्वाचा भाग समजला पाहिजे. यामध्येंही वाचकांस विविधता व व्यापकता आढळेल. विद्यार्थ्यांना आपल्या जीवनाचा विचार करावा लागेल, बरीचशी उपयुक्त माहिती गोळा करावी लागेल, आपापसांत नि शिक्षकांशीं विचारविनिमय करावासा वाटेल, अभिजात, तेजस्वी वाङमया-

कडे धांव घेण्याची इच्छा होईल आणि उत्तेजन मिळाल्यास, ते आपलीं मतें बनवून तीं लिहूनबोलून दाखवितील अशीच या अभ्यासाची योजना आहे. लेखकाला स्वतःच्या विद्वत्तेचें व कलेचें प्रदर्शन करून आपले निबंध अधिक भरदार करतां आलें असतें. पण त्यांनीं थोर शिक्षकाला साजेसें संयमन करून विद्यार्थीवाचकाला विषयाची चटक लागेल एवढेच मधाचें बोट लावण्याची दक्षता घेतली आहे, अणि बाकीचा मध स्वैरसंचाराच्या स्वप्रयत्नानें गोळा करण्याकरतां त्याला वाङमयोद्यानाची वाट दाखविली आहे. आत्मविकासाला आवश्यक असें विचार-प्रवर्तन हा जो पुस्तकाचा मूळ उद्देश त्याला साजेशीच ही पद्धति आहे. तिचा फायदा मात्र करून घेतला पाहिजे.

प्रस्तुत निबंधांचें लेखन प्रसंगोपात्त कसें झालें आहे याचा उल्लेख वर केला आहे. पण सर्व संग्रह वाचल्यानंतर लेखकानें तें एका विशिष्ट भूमिकेवरून केलें आहे असें दिसून यईल. लेखकाच्या मनांत असलेल्या आदर्श उच्च जीवनाची रूपरेषा स्पष्टपणें डोळ्यासमोर उभी राहील इतकी व्यापकता या छोटया संग्रहांत साधली असल्यानें 'जीवन विकास' या नांवाची यथार्थता मनाला पटते. ही रूपरेषा थोडक्यांत अशी देतां येईल. प्रत्येक व्यक्तीनें आरोग्य, शील, आशावाद नि उद्योग या साधनचतुष्टयाच्या जोरावर या जगांत मार्ग काढायचा असतो. वाटेंत, प्रत्येकानें आपल्या अपूर्णत्वाची जाणीव ठेवून जगांतील वैचित्र्याकडे जिज्ञासूवृत्तीनें आणि सहृदयतेनें पाहण्यास शिकलें पाहिजे. आपली उन्नति करून घेतांना आपणांस प्राप्तकर्तव्याचा नि इतरांच्या उन्नतीचाही विसर पडतां कामा नये. इतकेंच नव्हे तर स्वार्थ विसरून समाजसेवेला वाहून घेण्यांतच आपल्या स्वतःच्या जीवनाचें साफल्य आहे. सर्व धर्मांनीं सांगितलेल्या शुद्ध प्रेमाच्या जोरावर व्यक्तीचा आणि राष्ट्राचा विकास अविरोधानें साधतां येणें शक्य आहे. याच मार्गानें धैर्यानें पुढें जाणें हेंच खरें जीवन. अशा प्रकारचा तेजस्वी संदेश आपल्या मुलांमुलीपर्यंत आणून पोहोंचविल्याबद्दल श्री. छापेकरांना कोण धन्यवाद देणार नाहीं? त्यांनीं आपल्याला सादर केलेल्या विचारकलिकांची संगत, परमेश्वरानें आपल्या हातीं दिलेल्या जीवनकलिकांना लाभली तर त्यांच्या विकासाला साहाय्य होईल नि परिमलांतही भर पडेल.

टीचर्स कॉलेज, कोल्हापूर
२२-१०-४१

**बा. रा. कोलटकर**

रि. ७३८ नों. नं. ८१७८
मराठी ग्रंथ

# अनुक्रमणिका

१ प्रस्तावना--बा. रा. कोलटकर
२ वाचकांशीं हितगुज--लेखक

| | | |
|---|---|---|
| १ | जीवनाचा दृष्टिकोन ... | १ |
| २ | प्रेम व जीवन ... | ३ |
| ३ | आरोग्य-सुखी जीवनाचा पाया ... | ५ |
| ४ | अभ्यास नि अज्ञान ... | ७ |
| ५ | ज्ञानाची महति ... | ९ |
| ६ | मातृभाषेचा अभ्यास ... | ११ |
| ७ | प्रथम शील ... | १३ |
| ८ | मनाची गहनता ... | १५ |
| ९ | तारुण्यांतील सुखस्वप्नें ... | १७ |
| १० | धैर्याची आवश्यकता ... | १९ |
| ११ | कृति व काल ... | २१ |
| १२ | प्राप्तकर्तव्य ... | २३ |
| १३ | श्रम हा मानवधर्म ... | २५ |
| १४ | कर्तव्यमार्ग ... | २७ |
| १५ | नशिबावर हवाला नको ... | २९ |
| १६ | दु:खाची देणगी ... | ३१ |
| १७ | यशाची मीमांसा ... | ३३ |
| १८ | ध्येयानंतर मार्ग ... | ३५ |

| | | |
|---|---|---|
| १९ | ही असंतुष्टता चालेल ... | ३७ |
| २० | कर्तव्यानंद ... | ३९ |
| २१ | कृतीचें मूल्यमापन ... | ४१ |
| २२ | हें खरें राष्ट्रीयत्व ... | ४३ |
| २३ | हा पहा स्वदेशाभिमान ! ... | ४५ |
| २४ | स्वातंत्र्य ... | ४७ |
| २५ | स्वातंत्र्याच्या मर्यादा ... | ४९ |
| २६ | मनाचे प्रश्न ... | ५१ |
| २७ | समाज व व्यक्ति ... | ५३ |
| २८ | लोकशाही अयशस्वी कां ? ... | ५५ |
| २९ | हा खरा धर्म ... | ५७ |
| ३० | वाङमयाचें ध्येय ... | ५९ |
| ३१ | सत्याची सापेक्षता ... | ६१ |
| ३२ | युद्धाची फलश्रुति ... | ६३ |
| ३३ | प्रगति ... | ६५ |
| ३४ | क्रांति ... | ६७ |
| ३५ | " मरणांत खरोखर जग जगतें ! " ... | ६९ |

# वाचकांशीं हितगुज

प्रिय वाचक,

हें लहानसं पुस्तक आपल्या हातीं देतांना त्यांतील लेखनाचा थोडासा पूर्वेतिहास सांगणं मला माझं कर्तव्य वाटतं.

गेल्या सात आठ वर्षांच्या अवधींत मला अनेक शालेय विद्यार्थ्यांचा सहवास घडला. त्यांत कांहीं ध्येयवादी होते, कांहीं ध्येयशून्य होते; कांहीं हुशार तर कांहीं अगदींच सामान्य. या विद्यार्थ्यांच्या कल्पनांशीं एकरूप होण्याचा प्रयत्न केल्यावर मला असं आढळून आलं कीं त्यांची मनःस्थिति अगदीं गोंधळलेली आहे. त्यांच्या नैसर्गिक मनोवृत्तींना पूर्ण वाव मिळून त्यांना योग्य प्रकारें वळण लागावें असं वातावरण त्यांना नेहमीं लाभत नाहीं. यामुळें त्यांचं जीवन खुरटं होत चाललं आहे; त्यांच्या आकांक्षा सुप्तच राहताहेत नि त्याचा एकमेव परिणाम म्हणजे त्यांच्या प्रचंड शक्तीचा जितका उपयोग राष्ट्राला होणं जरूर आहे, शक्य आहे, तितका होत नाहीं. त्यांच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास होत नाहीं. अशा परिस्थितींत देखील ध्येयवादी विद्यार्थी सारखी धडपड करीत असतातच. या विद्यार्थ्यांनीं मला ज्या अनेक शंका विचारल्या नि त्यावर आम्ही जी चर्चा केली त्यांचेच पडसाद म्हणजे हें लेखन होय.

शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें व्यक्तित्व-विकासाला साधारणपणें कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याचा विचार करूनच मी हें लेखन केलें आहे. या प्रत्येक गोष्टीबाबत मोठमोठ्या विचारवंतांचीं मतं काय आहेत तीं सुद्धां प्रत्येक निबंधांत दिलेलीं आहेतच. हें लेखन करतांना माझ्या डोळ्यांपुढें प्रमुखत्वानें ज्या गोष्टी होत्या त्या अशा–शालेय

विद्यार्थ्यांचा व्यक्तित्व-विकास, एकाच मुद्यावर छोटासा निबंध तयार करणे व त्याला लघुभाषणाचं स्वरूप ठेवणें. या गोष्टी मी कितपत अमलांत आणूं शकलों हें प्रत्यक्ष पुस्तक वाचल्यावर आपणच ठरवूं शकाल.

या निबंधांचा वा लघुभाषणांचा अभ्यास होईलच पण त्याशिवाय प्रत्येक निबंधावर 'अधिक अभ्यास' दिलेला आहे. हें पाहून हें पुस्तक फक्त विद्यार्थ्यांकरतां आहे असा समज झाल्यास आश्चर्य नाहीं; किंबहुना तेंच अधिक सयुक्तिक आहे. त्याचं कारण असं कीं हें पुस्तक एखाद्या पालकानें नुसतं वाचून बाजूला ठेवलं तर फारसा उपयोग होणार नाहीं. त्यानें आपल्या मुलाला हें पुस्तक वाचायला लावून मोकळ्या मनानें त्या विद्यार्थ्यांशीं निबंधांतील अर्थबोधावर चर्चा करणें जरूर आहे.

लहानपणीं मुलां-मुलींनीं कोणत्या प्रकारें विचार करावा, कोणकोणतीं पुस्तकें वाचावींत, आपल्या आयुष्याचा दृष्टिकोन कसा ठरवावा व आपल्या जीवनाचा विकास कसा करून घ्यावा इत्यादि बाबतींतील थोडक्यांत मांडलेली चर्चा आपणांस या पुस्तकांत वाचायला मिळेल. आपणांस—विशेषतः शिक्षक, पालक व विद्यार्थी यांस या पुस्तकाची अल्पशी मदत होईल अशी आशा करतों.

प्रकाशक रामभाऊ भोगे व मलपृष्ठावरील चित्र काढून देणारे माझे सहकारी श्री. ताम्हणे यांचा मी अत्यंत आभारी आहे.

आपला,

**ल. नी. छापेकर**

१

# जीवनाचा दृष्टिकोन

आपलं जीवन सुखी, आनंदी, जिवंत असं व्हावं, असं कोणास वाटणार नाहीं ? जीवनांत जें सुख व्यक्तीला हवं असतं त्याबाबत निरनिराळ्या लोकांच्या खूप निरनिराळ्या कल्पना असतात. एकाच गोष्टीपासून दोन व्यक्तींना स्वभावभिन्नतेमुळे किंवा स्थितिभिन्नतेमुळें आनंद व दुःख अशा भिन्न भावनांचा अनुभव लाभणं अशक्य नाहीं. सुख–आनंद–चैन यांबद्दलच्या कल्पना कितीही भिन्न असोत, जिवंत जीवनाबद्दल मात्र असा विचित्र फरक आढळणार नाहीं. अशा जीवनाची कल्पना देत असतांनाच आपले राष्ट्रकवि रवींद्रनाथ टागोर* म्हणतात––"पानाच्या अग्रावर दंवबिंदूंचा नयनमनोहर नाच सुरूं असतो ना; तसा कालरूपी पानाच्या अग्रावर तुमच्या जीवनरूपी दंवबिंदूंचा नाच चालूं द्या."

राष्ट्रकवि टागोरांचं सगळें जीवनलेखन हेंच संपूर्णतया काव्यमय! मग त्यांना जीवनाची कल्पना देतांना निसर्गातलंच एखादं असं सुन्दर उदाहरण सहज स्फुरावं यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

दंवबिंदूचं जीवन किती थोडं! पण त्या लहानशा आयुष्याला तरी सौंदर्य आणण्याचा किती प्रयत्न! आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण लोकांना आनंद देण्यांत जावा याकरितां त्या दंवबिंदूची कोण धडपड! अन् त्यांत समाधान तरी किती! त्याला मोठमोठ्या वृक्षांची जरूरी तरी वाटते का ? सुन्दर सुन्दर पुष्पवाटिका बागेंत काय कमी फुलतात ? त्याशिवाय आपल्याला दुसरं स्थान लाभलं तर आपल्या सौंदर्याचा, मोठे-पणाचा अपमान झाला, असं कधींतरी त्या दंवबिंदूला वाटतं कां ? तृणपर्णावर सुद्धां आपलं सबंध जीवन कंठावं लागल्यास त्याची नेहमीं तयारीच! त्याला एक नक्की माहीत आहे कीं आपण कुठंही वास्तव्य केलं तरी तें सृष्टिदेवीची पूजा बांधण्यासाठींच!

* "Let your life lightly dance on the edges of time like dew on the tip of a leaf".

अन् समजा, मोठा वारा सुटला आणि हा दंवबिंदू खालीं घसरला; म्हणून कांहीं त्याला विशेष वाटत नाहीं. कारण पृथ्वीवर–सृष्टिदेवीच्या शरीरावरच ना–तो पुन्हां पडणार ? अशा या बिकट स्थलीं वास्तव्य असूनही त्याची सेवावृत्ति किती दांडगी ! सूर्याच्या प्रखर उष्णतेनें सृष्टिदेवीचें शरीर करपून जाऊं नये म्हणून जीवांत जीव आहे तोंपर्यंत सृष्टिदेवीच्या शरीराचं आपलं सर्वस्व वाहून तो रक्षण करीत असतो. आणि मजा अशी कीं हा त्याचा आत्मयज्ञ सुरूं असतांनाच त्याला मौक्तिक–सौंदर्य लाभतं. अग्नींत सोनं टाकल्यावर तें जसं जास्त सुन्दर व्हावं तसं आहे या दंवबिंदूचं.

कठीण परिस्थिति, लहान आयुष्य, अपमान वाटावा अशा स्थळीं नेऊन ठेवलेलं, असं असतांना देखील जी सेवावृत्ति तो दवबिंदु धारण करीत असतो यांतच खरा जिवंतपणाचा संदेश डॉ. टागोर आपणांस देत आहेत. कालरूपी पानाच्या टोंकावर बसायचें म्हणजे अगदीं अद्यावत् स्थितींत रहायचें आणि तेथें आपण आपलें जीवनसर्वस्व अर्पण करीत असतांना कोणतीही दुःखद भावना मनांत येऊं न देतां नाचायचें; किती सुन्दर कल्पना ! दिसायला–ऐकायला कठीण पण परिणामीं किती मोलाची ! हेंच खरं जीवन, बाकीची सारी कालगणना, नाहीं का ?

## अधिक अभ्यास

**(१) या निबधांत सांगितलेला ‘जीवनाचा दृष्टिकोन’ कोणता ? तो स्पष्ट करणाऱ्या निसर्गदृश्यांची यादी करा. तुम्हांला आवडेल त्या दृश्यावर एक लेखनखंड लिहा.**

**(२) डॉ. रवींद्रनाथांचें ‘गीतांजली’ हें पुस्तक जरूर वाचा. इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांतरें उपलब्ध आहेत. याच पुस्तकांतील पुढील वचन आहे. आपापल्या मतानें त्याचें थोडक्यांत स्पष्टीकरण करा–**

“Freedom is all I want, but to hope for it I feel ashamed”.

**“जीव माझा वांछी बंधविमोचन । परि लाजे मन इच्छायातें ॥”**

**(३) दंवबिंदूसारखे जीवन घालविणाऱ्या व्यक्तींचीं नांवें सांगा. कोणत्याहि एका व्यक्तीच्या कार्याची व्याख्यानाकरतां माहिती गोळा करा.**

२

# प्रेम व जीवन

प्रेमाची महति गाणारे कवी व कादंबरीकार प्रत्येक राष्ट्रांत सांपडतातच. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास चाळा, एक कल्पना तुम्हांला हमखास सांपडेलच, अन् ती कोणती ? तर सकल लोकांवर प्रेम करणं हाच खरा धर्म, हीच खरी ईश्वरसेवा ! अशी कल्पना सर्व राष्ट्रांत कां प्रसृत व्हावी ? आपण सर्वसाधारण माणसं नेहमीं अभिमानानं सांगतों कीं आमची संस्कृति इतरांच्या संस्कृतीपेक्षां फार भिन्न आहे; पण असं जगाच्या मोलाचं तत्त्व सर्व धर्मांतून, सर्व राष्ट्रांतून एकाच स्वरूपांत नाहीं कां सांपडत ? निसर्गाच्या अनेक सुन्दर सुन्दर कृती हाच नाहीं कां संदेश देत ?

ज्या पुष्पांवर आपण निरतिशय प्रेम करतों नि त्यांवर मोहून जातों त्या पुष्पांचं व मानवाचं जीवन किती सारखं आहे ! दोहोंनाही जन्ममृत्यु आहेत, दोहोंनाही अत्यंत लहान असं जीवित आहे––पण फुलांचं सेवाव्रत अव्याहत सुरू असतं, नाहीं कां ? रानांत असो वा बागेंत असो; आपल्या कपड्यावर विराजित होवो वा देवाच्या शिरीं वास करो; आपलं सेवाव्रत–सर्वांनाच सुवास देण्याचं कार्य––सतत सुरू असायचं ! बरं, ही मानवा-पुरतीच सेवा असती तर गोष्ट निराळी––अनेक कृमीकीटक येऊन त्या फुलांतील सुवास, मध वगैरेंचा मनसोक्त उपयोग करतील. सर्वस्व देऊन टाकण्यांतच फुलाची इतिकर्तव्यता !

व्हिक्टर ह्यूगोंचं* सांगणं सुद्धां असंच आहे. आपलं जीवन हें जर एक फूल असेल तर प्रेम हें त्यांतला मध आहे. तत्त्व अत्यंत सुन्दर आहे. सर्व जगाला सुखी करण्याचा महामंत्र त्यांत आहे असं नाहीं वाटत तुम्हांला ?

शिवाय व्हिक्टर ह्यूगो एक स्वप्नाळू कवि असते तर म्हटलं असतं, त्यांना व्यवहार समजत नाहीं म्हणून. फ्रान्समधल्या क्रांतीवर अत्यंत व्यवहारपूर्ण, सत्य गोष्टीवर विदारक प्रकाश पाडणारे ते लेखक; मानवी

* "Life is a flower of which love is the honey."

जीवनाचा आपल्या महात्माजीप्रमाणें सखोल अभ्यास केलेले विचारवंत असा त्यांचा लौकिक. अर्थात् त्यांचं मानवी जीवनाबद्दल झालेलं मत पुष्कळसं अनुभवानंच बनलं आहे असं म्हणावयास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

जीविताला पुष्पाची उपमा देणारे अनेक आहेत, पण त्यांतील मध म्हणजेच प्रेम हें सांगणारे मात्र विरळा. यांतच मानवधर्माचं सार आहे. कोणाकरितांही सेवा करायला तयार असणं; आपल्यांत जो विशेष आहे त्याचा सर्वांना लाभ देणं; त्याचा जगाला मानवधर्म शिकविण्यांत जास्तींत जास्त उपयोग करणं हाच खरा मानवधर्म आहे; हाच मानवी संस्कृतीचा गाभा आहे. "मला जगांत शत्रूच नाहीं," असं जेव्हां महात्माजी म्हणतात तेव्हां त्यांतला उद्देश सेवा हाच आहे. सर्वच सेवा घेण्यालायक, मग शत्रू कोण असणार ? अशीं माणसं व त्यांचीं असलीं गोड वचनं म्हणजे परीसच जणू ! कोणीही तो उचलावा आणि आपल्या जीवनाचं सोनं करून घ्यावं.

सगळं जग जिंकावं व आपलंसं करून टाकावं हें खरं, पण तें प्रेमानं जिंकलं नसेल तर जीवन सुखी होणें कठीण. प्रेमभावनेनें केलेली मानवाची समाजसेवाच त्याला संतुष्टता देईल.

## अधिक अभ्यास

**(१) 'प्रेममय व्हावें, प्रेमानें जग जिंकावें।' याचा अर्थ स्पष्ट करण्याकरतां एक परिच्छेद लिहा. याच अर्थाचें इंग्रजी वचन कोणतें ?**

**(२) "अशीं माणसं व त्यांचीं असलीं गोड वचनं म्हणजे परीसच जणू."—यांतील अर्थ उदाहरणें देऊन स्पष्ट करा.**

**(३) Les Miserable हें व्हिक्टर ह्यूगोंचें उत्तम पुस्तक, पुढें, केव्हांतरी वाचायचेंच अशी दैनंदिनींत जरूर नोंद करा.**

३

# आरोग्य

खेड्यापाड्यांतून पुष्कळशा नव्या नव्या म्हणी आपल्या कानांवर येतात. त्या दिसायला साध्या, अगदीं अशिक्षित तोंडांतून आलेल्या अशा जरी दिसल्या तरी त्यांच्यामागें अनुभवाचं खूप मोठं भांडवल असल्यामुळें त्यांतून जीवन यशस्वी, सुखी व आशादायी करण्याकरितां लागणारा मालमसाला भरपूर असतो.

एक अरबी* म्हण सुद्धां अशीच आहे. जो इसम निरोगी आहे तो आशावादी आहे; अन् त्याचेजवळ आशा असल्यानंतर त्याला प्रत्येक गोष्ट सुसाध्य आहे.

थोडक्यांत सांगायचं म्हणजे आरोग्य नि आशावाद हीं अगदीं हातांत हात घालून या जगांतील यशस्वी जीवनमार्गावर इतस्ततः सुखानें हिंडतात व अनेक व्यक्तींना त्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करतात.

निरोगी म्हणजे धष्टपुष्ट मात्र नव्हे. एकादे वेळीं खूप शक्ति असून देखील त्या व्यक्तीला एखादा रोग असणें संभवतें. निरोगी माणसाचं तसं नाहीं. त्याला अचाट शक्तीचं काम करतां येणार नाहीं; पण एकादं काम हातीं घेण्याची, तें शेवटपर्यंत तडीस नेण्याची व त्याचे बरेवाईट परिणाम सोसण्याची तयारी असल्या निरोगी व्यक्तीच्याच अंगीं असूं शकते, हें मात्र त्रिवार सत्य आहे.

आशावाद ही जीवनांतील एक जादू आहे. जीवनांतून आशाच नाहींशी करा, त्यांतील स्वारस्यच नाहींसं होईल. कविवर्य तांबे म्हणतात, "मरणांत खरोखर जग जगतें." किती दुर्दम्य आशावाद आहे, नाहीं? मरणाची भीति तर नाहींच; उलट त्यांतच जीवन! पण मरणांतही असला जिवंतपणा आणायला अंगांत कर्तृत्वशक्ति पाहिजे. कार्य केल्या-

* "He who has health, has hope; and he who has hope, has everything."

नंतरचं मरणच आपल्याला शाश्वत जिवंत ठेवूं शकतं. " जगण्यासारखं जोंपर्यंत कांहीं आहे तोंपर्यंतच मरणांत मौज आहे," या म्हणण्यांतही जीवनांतील आशावादच अधिक प्रतीत होतो. अशा प्रकारची आनंदी, कार्यशील, चिकाटीची व दुर्दम्य आशावादी वृत्ति आपल्या निरोगीपणावर अवलंबून आहे, हें मात्र विसरतां कामा नये.

निरोगत्व, आशा व यश अशा सुखी जीवनाच्या पायऱ्या आहेत. प्रत्येक मानवानेंच यांकडे प्रथम लक्ष दिलं पाहिजे.

## अधिक अभ्यास

**(१) या अरबी म्हणीप्रमाणें आपल्या मराठींत देखील खूप चांगल्या चांगल्या म्हणी आहेत. निवडक दहा लिहा. आवडेल त्या म्हणीवर एक २५–३० ओळींचा रचनापाठ लिहा.**

**(२) खालीं दिलेले मुद्दे वापरून एका म्हणीवर पांच मिनिटें पुरेल असें एक छोटेसें व्याख्यान तयार करा––**

**म्हण–कोणाच्या तोंडीं विशेष–त्यांच्याच तोंडीं कां ?–केव्हां ऐकली–स्पष्टीकरणार्थ उदाहरणें–वाङ्मयांत वापरतात काय ?–कां ?–आज ती कशी लागूं पडते ?**

**(३) शाळेंतील अथवा गांवांतील आरोग्यसप्ताहाकरतां आरोग्य-विषयक म्हणी तयार करा.**

**(४) 'प्रथम शरीर कीं प्रथम मन' यावर वादविवाद करा. शारीरिकशिक्षणशिक्षक किंवा तज्ज्ञ यांची मदत घ्या.**

# ४
# अभ्यास नि अज्ञान

प्रख्यात आंग्लकवि शेली यांनीं एके ठिकाणीं असं म्हटलं आहे, "The more we study the more we discover our ignorance". हें वचन त्यांच्या काव्यांतलं मात्र नाहीं. त्याचा साधा अर्थ असा--जसजसा आपण अधिक अभ्यास करीत जाऊं तसतसं आपल्याला आपलं अज्ञान अधिकाधिक समजून येईल.

विचित्र वाटतं नाहीं हें वचन ? अभ्यासानं आपलं अज्ञान नाहींसं होतं, असा आपला समज असतो. आणि तो खोटा पण नाहीं. मजा अशी कीं अभ्यास करण्यापूर्वी आपण अनेक कल्पना करून घेतलेल्या असतात व अभ्यास केल्यानंतर आपल्याला कळून येतं कीं त्या चुकीच्या कल्पना आहेत म्हणून.

म्हणण्याचा आशय असा कीं आपण अनेक गोष्टीसंबंधीं अज्ञानी असतों व तें अज्ञान आपल्याला स्पष्ट दिसावें--आपला मार्ग आपणांस अचुक सापडावा--असं जर वाटत असेल तर आपण सतत अभ्यासाचं व्रत घेतलं पाहिजे.

अज्ञान नाहींसं होणं म्हणजेच ज्ञान मिळणं, नाहीं का ? उदाहरणंच द्यायचीं झालीं तर कित्येक गोष्टींचीं देतां येतील. साधं इंद्रधनुष्यच घ्या ना. हा एक सृष्टिचमत्कार नसून त्यामागें कांहीं दैवी घटना आहे, अशी आरंभीं कल्पना. ती हळू हळू नाहींशी होत गेली व आज लहान मुलेही त्या गोष्टीचं स्पष्टीकरण देऊं शकतील.

मनुष्याला प्रत्येक गोष्टीबद्दल कुतूहल असतं. तें कुतूहल त्याला निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करायला भाग पाडतें. हा अभ्यास मूलगामी आणि सखोल असला, अभ्यासाचा विषय योग्य प्रकारें निवडला गेला असला, तर त्या व्यक्तीचें पूर्वीचें अज्ञान त्याला स्पष्ट दिसतें व नंतर त्याच्या ज्ञानांत भर पडते. लहानमोठ्या विद्यार्थ्यांनीं कोणत्याही प्रकारचीं

मतें बनविण्यापूर्वी, कोणताही सिद्धांत स्वीकारण्यापूर्वी या पद्धतीचा अवलंब करावा. प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करावा व आपलीं चुकीचीं मतें बाजूस सारून खरें ज्ञान प्राप्त करून घ्यावें. अर्थात् अभ्यासाबद्दल--आपल्या मतांचा व कल्पनांचा खरेंपणा निकषाला लावण्याबद्दल--कुतूहल मात्र त्यांच्या ठिकाणीं असणें जरूर आहे. असं कुतूहल तुमच्या हृदयांत आहे; तें नेहमीं जागृत ठेवा. निरनिराळ्या गोष्टींचा अभ्यास करा व आपण स्वत:करितां व आपल्या मानवजातीकरितां कांहीं तरी केल्याचं श्रेय मिळवा, अशीच कोणाही सुविद्य माणसाची अपेक्षा असेल.

## अधिक अभ्यास

(१) पुस्तकाचें वाचन कसें करावें ? त्यांचीं टिपणें कशीं करावीं ? यावर अनुभवी व्यक्तींशीं चर्चा करा. पुढील पुस्तकें वाचून टिपणें करा--

| | |
|---|---|
| प्रकाशांतील व्यक्ती | श्री. प्रभाकर पाध्ये |
| उल्का | श्री. वि. स. खांडेकर |
| आशियाचे धर्मदीप | श्री. गोपीनाथ तळवलकर |

(२) Shelley या कवीची 'To Skylark' ही कविता अभ्यासा व 'चंडोलास' उद्देशून कवितेंतील भावार्थ मराठींत लिहा.

(३) या निबंधाचा आशय तुम्ही तुमच्या भाषेंत लिहून दाखवा.

५

# ज्ञानाची महति

मनुष्यप्राणी म्हटला कीं आशा–आकांक्षा या ठरलेल्याच. रोज रोज नवीन नवीन इच्छा उत्पन्न व्हायच्या व त्यांची पूर्ति करून घेण्याकरितां विविध मार्गांचा त्या व्यक्तीला अवलंब करावा लागायचा, हा एक मनुष्य-स्वभावच आहे.

पण या आशा–आकांक्षा नेहमीं चांगल्याच स्वरूपाच्या असतील असेंच कांहीं नाहीं ! कांहीं दैवी व कांहीं असुरी असायच्या. आपण स्वतः होऊन सर्व सुखोपभोग उपभोगावे व इतरांनीं तें सर्व दृश्य भुकेल्या डोळ्यांनीं पहावें अशा आसुरी आकांक्षा असलेल्या कितीतरी व्यक्ती आपण पाहतों. या व्यक्तींना इतरांबद्दल––त्यांच्या संकटांबद्दल व मनोभूमिके-बद्दल––ज्ञान नसतें, जाणीव नसते असं म्हणणं चुकीचं होईल. त्यांना ज्ञान असतं पण तें चुकीचं असतं.

'ज्ञान नेहमींच पवित्र. त्याला कुणाच्याही असमाधानाचा, रक्ताचा स्पर्श होतां कामा नये' अशी ज्ञानाची भूमिका ज्याला समजली आहे त्या ज्ञानी इसमाच्या इच्छा नेहमीं दुसऱ्याचं हित सुस्पष्ट रीतीनें पाहण्याच्या प्रयत्न करतील. किंबहुना ड्यूरंट* म्हणतात त्याप्रमाणें ज्ञान हा इच्छेचा डोळा आहे. या डोळ्यानें जर सर्व बाजूला पाहिलें तर आपल्या मनांत ज्या ज्या इच्छा निर्माण होतील त्या सर्व ज्ञानमय असतील; त्यांत दुसऱ्यांना ज्ञान देऊन अनेक अज्ञानमूलक घटनांवर प्रकाश पाडायची शक्ति असेल यांत किमपिहि संदेह नाहीं.

या ज्ञानरूपी नेत्रांतून दिसणाऱ्या आकांक्षांच्या सुद्धां पायऱ्या असणें संभवनीय आहे. मानसशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादि अनेक विषयांवर आज कितीतरी माहिती उपलब्ध आहे. व सर्वसाधारण

---

* "Knowledge is the eye of desire and can become the pilot of the soul."

माणसाला त्याच्या इच्छेला येईल तेव्हां त्यांचा भरपूर उपयोगही करतां येतो. पण यापलीकडेसुद्धां कांहीं प्रश्न उभे राहतात. या जगाची उभारणीच कां झाली ? कोणत्या तत्त्वावर ? कोणाकडून ? वगैरे प्रश्न अनेक तत्त्ववेत्त्यांसमोर आजही उभे राहतातच. त्यांचं उत्तर देणारं ज्ञान आपल्याला लाभलं तर तेंच ज्ञान आपला संपूर्ण उद्धार करून आपल्या आत्म्याला चिरशांतीच्या स्थानाला सुरक्षितपणें नेल्याशिवाय रहाणार नाहीं, असा विश्वासहि ते प्रकट करतात. यावर एखादा उठेल नि म्हणेल, "हा एक निव्वळ दैववाद आहे, ज्ञानाचा आभास आहे व स्वतःच्या बुद्धीची फसवणूक आहे." प्रथमदर्शनीं हें खरं पण वाटेल. परंतु जरा खोल विचार केला तर दिसून येईल कीं कोणत्याही शास्त्राचा सखोल अभ्यास करण्याची प्रवृत्ति, आपल्या राष्ट्रबांधवांना किंवहुना कोणत्याही मानवाला जाचक न होणारी आपली वृत्ति व आपल्या ध्येयाशीं (अर्थात् खूप विचारांतीं व विचार परिपक्व झाल्यावर ठरविलेल्या ध्येयाशीं) एकरूप होण्याची पात्रता इतक्या गोष्टी साध्य झाल्यावर मेल्यानंतरच काय पण जिवंत असतांना सुद्धां प्राप्त झालेलें ज्ञान आपणांला शांतिस्थानाकडे नेईल. जरूर आहे, ज्ञान व इच्छा यांचा अन्योन्य संबंध ओळखण्याची.

## अधिक अभ्यास

(१) 'ज्ञान हें विष कीं अमृत' हा श्री. वा. म. जोशी यांचा निबंध वाचा नि नीट समजावून घ्या.

(२) "इच्छा असली तर ज्ञान मिळवितां येतें" या विधानाच्या विरुद्ध बाजूनें बोलण्याकरतां भाषण तयार करा.

(३) विल् ड्यूरंट हे एक मोठे विचारवंत लेखक आहेत. आपल्या मराठी वाङमयांत असे लेखक कोणते ? शिक्षकांशीं चर्चा करून व स्वतः वाचून तौलनिक दृष्टीनें माहिती मिळवा.

स. निबंध-०३५
०१.१. १९७८

६

# मातृभाषेचा अभ्यास

आज जगांत प्रत्येक गोष्टींतील मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करून त्या त्या विषयावर मत प्रदर्शित करणाऱ्या ज्या कांहीं बोटांवर मोजण्याइतक्या व्यक्ती आहेत त्यांतील एक म्हणजे एच्. जी. वेल्स हे गृहस्थ होत.

शास्त्रज्ञ, कादंबरीकार व आधुनिक विचारप्रवाहांचे आघाडीचे टीकाकार म्हणून सर्व जगांत वेल्स यांची प्रसिद्धि आहे. अशी ही मान्यता पावलेली व्यक्ति काय म्हणते पहा*--

" प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची मातृभाषा चांगली समजली पाहिजे; चांगल्या प्रकारें बोलतां, वाचतां व लिहितां आली पाहिजे."

मला तरी वेल्स यांचं म्हणणं तंतोतंत पटतं. आपल्या मनाला व मेंदूला ज्या भाषेंतून विचार करायची संवय लागली त्या भाषेवर आपण जर प्रभुत्व मिळवलं तर अनायासेंच आपली विचारशक्ति वाढून आपली निरनिराळ्या विषयांत प्रगति व्हायला सोपें जाईल.

मातृभाषा समजणं व बोलणं निराळं नि उत्तम प्रकारें वाचतां व लिहितां येणं निराळं. आपल्याकडे तर इतकी हलाखीची स्थिति आहे कीं एखादा इंग्रजी शिकलेला इसम फारच क्वचित् प्रसंगीं पूर्णतः मातृभाषेत बोलू वा संभाषण करूं शकेल--मग उत्तम लिखाण तर लांबच राहिलं, नाहीं कां ?

'हें असं कां' याचा कधीं विचार तरी आपण करतों का ? दुसऱ्या भाषेचं आपल्या मनोभूमिकेवर जें आक्रमण होत आहे याची अनेक वेळां कल्पना येऊनही आपण तिकडे डोळेझांक करतों.

माझा brother sick आहे अशा प्रकारची धेडगुजरी रचना पाहिली म्हणजे मला मनस्वी चीड येते. असं भाष्य करण्याऐवजीं सरळ इंग्रजींतच बोलायला काय हरकत आहे ? अशा बोलण्यानें दोन्ही भाषांना

---

*"First we shall want the pupil to understand, speak, read and write his mothet tongue well."

आपण अपमानित करतों. अनेक इंग्रजी शब्दांना आपल्याकडे रूढ प्रतिशब्द असतांना हे शब्द मराठी रचनेंत वापरण्यांत तुम्ही स्वतःवर मोठाच अत्याचार करीत आहांत, अशी धोक्याची जाहीर सूचना देण्याचा समय आज खास आलेला आहे.

प्रत्येक मातृभाषेचा इतिहास अगदीं टाहो फोडून हेंच सांगतो. मातृभाषेची अवहेलना करणें म्हणजे स्वत्वाला विसरणें, आपल्या विचार-शक्तीचा ऱ्हास करणें व परिणामीं देशाचं मोठं अहित करण्यासारखं आहे. ज्ञानेश्वर महाराजांपासून तों माधवराव पटवर्धनांपर्यंत सर्वांनीं मराठीचे जे गोडवे गाइले आहेत ते या मातृभाषेवरील प्रेमामुळेंच. 'मराठी असे आमुची मायबोली' असे शब्द कानीं पडल्याबरोबर मराठी मातृभाषा असणाऱ्यांच्या अंगांतून जी एक लहर निर्माण होते त्याचा अर्थच हा कीं त्या भाषेशीं आपले अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत, आपणांवर तिचे अनेक उपकार आहेत आणि त्याची फेड आपण कृतज्ञतेनें सेवा करून केली पाहिजे. मातृभाषेत आपल्याला शुद्ध तर लिहितां आलेंच पाहिजे, पण आपल्या लिखाणाला एक विशिष्ट शैलीसुद्धां लाभायला पाहिजे.

मातृभाषेचं महत्त्व अमर्याद आहे. तिच्याशिवाय कोणाचंहि जीवन अपूर्णच राहील. वेळेला आईशिवाय एकाद्याचं जीवन यशस्वी होईल पण मातृभाषेशिवाय ? जननी सर्व व्यक्तींमध्यें श्रेष्ठ आहे यांत शंकाच नाहीं, पण प्रत्येक व्यक्तीला जननीपेक्षांही जन्मभाषा अधिक श्रेष्ठ आहे हें ध्यानांत ठेवा.

## अधिक अभ्यास

**(१) मराठी भाषेचें गुणवर्णन करणाऱ्या कवितांचा संग्रह करा. त्यांचा उपयोग करून 'मराठी भाषेचा मोठेपणा' यावर एक छोटासा निबंध तयार करा.**

**(२) नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या अनावश्यक इंग्रजी शब्दांची नोंद करा. त्याकरतां मराठी शब्द शोधा. हे शब्द वापरावेत कीं न वापरावेत यावर चर्चा करा.**

**(३) "मातृभाषेची अवहेलना करणें म्हणजे स्वतःला विसरणें;" हें विधान तुम्हाला पटतें काय ? तुमचें मत स्पष्ट करा.**

**(४) "जननीपेक्षांहि जन्मभाषा श्रेष्ठ आहे." यावर वादविवाद करा.**

७

# प्रथम शील

अनेक व्यक्तींचा एक समाज तयार होत असतो. व्यक्ति आणि समाज यांचे संबंध स्पष्टपणें समजल्याशिवाय व्यक्तीला समाजांत योग्य तें स्थान लाभणार नाहीं असं म्हणतात. आणि तें खरं पण आहे. सामाजिक नियम हे आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याला पोषक आहेत, किंबहुना यामुळेंच त्या व्यक्तीचें स्वातंत्र्य सुरक्षित आहे, असं म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. हें सर्व सांगितलं अशा करितां कीं व्यक्तीनें हीं बंधनं झुगारून दिलीं तर समाजांत कांहीं काल अस्वस्थता निर्माण होईल, समाजाची घडी विस्कटेल आणि यादवी माजण्याचा सुद्धां संभव निर्माण होईल. समाजाच्या विरुद्ध व्यक्तीनें कधींच जाऊं नये असं नाहीं; द्रष्टा होण्याकरितां जरूर जावं, आपल्या उदाहरणानं सर्वांना योग्य, प्रगतीपर व अंतिम हिताचा मार्ग दाखवावा.

पण हें केव्हां साधणार ? इतकी लायकी कशी येणार ? आणि लायकी प्राप्त झाली तरी तिचा उपयोग कोणत्या रीतीनें केला जाणार ? असली शक्ति निर्माण होण्याकरितां व्यक्तीच्या अंगीं उत्तम शील पाहिजे; त्याकरितां लागणारे सर्व गुण अंगीं बाणले पाहिजेत. दुर्गुणी पण हुशार व शक्तिमान् पण दुर्गुणी अशा व्यक्तीपेक्षां सर्वसाधारण नमुन्याची व्यक्ति समाजांत अधिक उपयोगाची ठरते. याचं कारण असं कीं त्या व्यक्तीचं शील हें समाजाच्या वाढीला पोषक असं असतं.

राष्ट्रांत एक दोन व्यक्ति उत्तम शीलवान् असल्या तर त्यांजबद्दल अभिमान वाटतो, आदर सारखा वृद्धिगत होत जातो व त्यांच्याप्रमाणेंच आपणही व्हावें असं पुष्कळांना वाटायला लागतं. असा परिणाम होतो यांत शंका नाहीं पण फार थोड्या लोकांवर; आणि तो टिकतोही फार थोडा काल. समाजच चांगला प्रगतिप्रिय असावा असं वाटत असेल तर त्या समाजांतील प्रत्येक व्यक्ति शीलवान् पाहिजे. अशा शीलवान् व्यक्तींवरच त्या समाजाची--राष्ट्राची--कदाचित् सर्वांचीच--प्रगति

अवलंबून आहे. आणि म्हणूनच समाजाबद्दल चॅनिंग्* म्हणतात तें खरं वाटतं. तें म्हणतात कीं व्यक्तीचं शील हेंच समाजाच्या आशा-आकांक्षांचें केंद्रस्थान आहे. सर्व व्यक्तींची वागणूक चांगली असली व त्यांच्यांत शील बनविणारे धैर्य, शालीनता, विद्वत्ता वगैरे गुण बाणले असले म्हणजे तो समाज उत्तम स्थितीस पोहोंचला असं म्हणण्यास हरकत नाहीं. व्यक्तीच्या शीलाला समाजाच्या दृष्टीनें असं अत्यंत महत्त्व आहे.

पण ही गोष्ट आपल्या प्रौढ विद्यार्थ्यांना समजेल तो सुदिन. त्यांची हुच्च वृत्ति, विद्यालयांतील आपल्या मित्रमैत्रिणींबद्दल बेजबाबदार वागणूक, शिक्षकपालक यांबद्दल संशयी वृत्ति व समाजांत हिंडतांना दुसऱ्यांच्या भावनांकडे मुळींच लक्ष न देतां वाटेल तें करणं हें सारं अत्यंत निंद्य आहे. यामुळेंच विद्यार्थ्यांचीं शीलं लवकर बनत नाहींत, त्याकरितां त्यांना पुढील आयुष्यांत प्रयत्न करावे लागतात व साहजिकच समाज लवकर पुढें येत नाहीं—अन् म्हणूनच व्यक्तीनं सामाजिक हिताकडं लक्ष पुरवायचं असेल तर प्रत्येकानं आपलं शील प्रथम बनविलं पाहिजे.

## अधिक अभ्यास

(१) 'शील कसें बनत जातें?' यावर पुढील मुद्दे वापरून एक भाषण तयार करा—

लहानपण म्हणजे वळण लावण्याचा काल—भोंवतालची स्थिति—शाळा—संवयी—वृत्ति—त्यानंतर त्याच्या स्थिरवृत्ती—शील.

(२) प्राध्यापक फडके यांचें 'आजकालची तरुण स्त्रीपुरुष व त्यांचे पुढील प्रश्न' आणि श्री. साने गुरुजी यांचें 'भारतीय संस्कृति' हीं पुस्तकें अभ्यासा.

(३) आपलें शील बनविण्याकरतां आपण रोज काय करतों याची दैनंदिनींत नोंद करा.

(४) 'शीलं परं भूषणम्' यासारख्या शीलाचें महत्त्व वर्णन करणाऱ्या निरनिराळ्या भाषांतील उक्ती गोळा करून पाठ करा.

---

* "The great hope of society is in individual character."

८

# मनाची गहनता

वर्गात अथवा सभेंत एखादा आकस्मिक प्रसंग घडावा, त्याकडे सर्वांचें लक्ष वेधावें व निरनिराळ्या व्यक्तींवर परस्परभिन्न असे पडसाद उमटावे आणि त्याहीपेक्षां चमत्कारिक म्हणजे सारखे पडसाद उठलेल्या कांहीं व्यक्तीकडून त्या क्षणानंतर एकमेकांस विरोधी अशा कार्यदिशा ठरविल्या जाव्यात--अशीं उदाहरणें आज कांहीं आपल्याजवळ थोडींथोडकीं नाहींत. लोकमान्य टिळकांचीं वचनें घेऊन त्या वाक्यांची भिन्न भिन्न मतांच्या लोकांनीं केलेली चिरफाड व त्यांतून शोधून काढलेले विसंगत अर्थ आज कितीतरी ठिकाणी वाचायला नि ऐकायला मिळतील. याचं कारण असं कीं प्रत्येक व्यक्तीचं मन हें एक मोठं शास्त्र आहे.

पुस्तक वा ग्रथरूपानें जीं शास्त्रें--वैद्यक, भूगर्भ, ज्योतिष इत्यादि--आपणांस माहित आहेत त्या शास्त्रांपेक्षां मन हें कितीतरी निराळं आणि सनातन शास्त्र आहे. शास्त्रीय दृष्टिकोनांतून ग्रहण बदललं, पृथ्वीचा आकार बदलला किंबहुना निसर्गाकडे पाहण्याची दृष्टीच बदलली पण मनोव्यापारांच्या शास्त्राची गहनता बऱ्याचशा अभ्यासानंतरही अद्याप गहनच वाटते. इतर शास्त्रांपेक्षां हें शास्त्र अधिक चल आहे कारण प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून भिन्न असल्यामुळें सर्व व्यक्तींचे मनोव्यापार सारखे नसणार; शिवाय एकाच मनुष्याच्या मनाचे खेळ एकाच वस्तूबद्दल वेगवेगळ्या क्षणीं वेगवेगळे असणार, अन् म्हणूनच हें शास्त्र चल म्हणजे नेहमीं कोठल्यातरी निराळ्या अवस्थेंत असणारं असं झालं आहे. कठीणपणाच्या दृष्टीनं जसं हें सांगतां येतं तसंच थोडंसं लोकहितवादींनीं* त्याला मोठं शास्त्र कोणत्या दृष्टीनं ठरविलं हेंहि सांगायला पाहिजे.

लोकहितवादी कै. चिपळुणकरांच्या काळचे. समाजरचनेचा त्यांनीं अगदीं द्रष्टे म्हणून अभ्यास केलेला. बुद्धीवर त्यांचा भयंकर विश्वास.

---

* "मन हेंच मोठे शास्त्र आहे व लिहिलेलीं शास्त्रे सर्व त्याचे खालीं आहेत."

ऋषीप्रणीत नियम बुद्धीला पटले तरच स्वीकारा नाहींतर आपल्या काळाला योग्य वाटतील ते नियम तयार करावें व आपलीसुद्धां लायकी कमी नाहीं हें सिद्ध करावें, ही त्यांची विचारसरणी. अशा एका थोर विचार- वंताचं हें वचन असल्यामुळें त्याचा अर्थ--किंवा फार तर शिकवण म्हणा— त्यांच्याच चष्म्यांतून पाहिलेली चांगली. प्रत्येक व्यक्तीचं मन हें स्वतंत्र आहे पण त्याला समाजांतसुद्धां स्थान आहे. हीं सर्व मनं जेव्हां एकत्र येतात तेव्हां एक सामाजिक मन तयार होतं नि या सामाजिक मनाचे व्यापार सुरूं होऊन कांहीं नीतिनियम वा इतर नियम ठरतात. यांतले बरेचसे अलिखित असतात आणि तरीसुद्धां त्यांचा प्रभाव कमी नसतो. हें मोठेपण आपण जरूर ध्यानांत घेतलं पाहिजे. सर्व गोष्टी आपल्या मनावर बिंबवून त्याचा सामाजिक ठसा उमटविण्याची पराकाष्ठा होणें जरूर आहे. तें आपल्या नकळत होतेंच पण आपली बुद्धि खर्चून, समजून केलें तरच तें प्रगतिपर म्हणविणाऱ्या मानवाला शोभेल. मनाची गहनता प्रत्ययास येते ती अशा वेळींच.

## अधिक अभ्यास

(१) 'माझ्या मनाचे प्रवास' यावर एक निबंध तयार करा.

(२) 'व्यक्ती तितक्या प्रकृती;' असें असतांनासुद्धां एक सामाजिक मन तयार होऊं शकतं–असें विधान या निबंधांत केलें आहे. तुम्हांस काय वाटतें? कां?

(३) 'लोकहितवादींचीं शतपत्रें' हें पुस्तक जरूर अभ्यासा. आजच्या समाजाला लागूं पडतील असे उतारे लिहून काढा.

९

# तारुण्यांतील सुखस्वप्नें

प्रत्येकाच्या आयुष्यांत तारुण्याचा उन्मादकारक, बेछूट व मोठमोठ्या ध्येयांचा विचार करण्याचा काल येऊन जातोच. जसं वातावरण मिळेल तसं तो आपलं ध्येय बनवितो, असा सर्वसाधारणपणें समज असतो; पण तो तितकासा बरोबर नाहीं.

अन् याचं कारण शोधायला फारसं लांब जायला नको. तें व्यक्तीच्या तारुण्यसुलभ मनोवृत्तींतच सांपडेल! तारुण्याचा उन्मादच असा असतो कीं धाडसाशिवाय चैनच पडत नाहीं; आपणांस हवीं तीं ध्येयें ठेवून बेफिकीरपणें त्यांमागून जातांना—किंचित्काल कां होईना—जगाची पर्वा करावीशी वाटत नाहीं; पण एकदां अनुभवाची आंच लागली म्हणजे संकटसूर्याच्या प्रखर किरणांनीं ध्येयाचे दंवबिंदू तेव्हांच करपून जातात, किंकर्तव्यमूढता अंगीं येते व ती व्यक्ति अंतर्मुख होते. यानंतर ती व्यक्ति—स्त्री असो वा पुरुष असो—खूप खूप सुखस्वप्नं रचायला लागते. आपण हें करूं, तें करूं, असे अनेक संकल्प सोडीत असते. कित्येक व्यक्ती तर इतक्या पुढें जातात कीं त्यांना आजची परिस्थिति आपण पार बदलून टाकूं व आपणाला हवी तशी रचना करून घेऊं—एक निराळा स्वर्गच आपण या पृथ्वीवर निर्माण करूं——असं वाटायला लागतं.

प्रत्येक कल्पना सत्यस्वरूपांत येण्याच्या लायकीची असते पण त्यामागें ती मूर्त स्वरूपांत उभी करण्याकरतां लागणारी सिद्धता मात्र तयार पाहिजे. पुष्कळशा तरुण व्यक्तींचं असंच होतं——अनेक मोठमोठीं कार्यें अंगावर घ्यायचीं ठरवितात पण पुढें एकदां कां ज़ीवनाचा सर्वसाधारण मार्ग सुरूं झाला कीं त्यांनीं उभारलेल्या कल्पनांचा त्यांना विसर पडतो व निव्वळ त्यांच्या कमकुवतपणामुळे चांगलीं चांगलीं ध्येयें अव्यवहार्य ठरतात.

अगदीं याच वेळीं शिलर* यांनीं दिलेली सूचना सांगाविशी वाटते. "आपल्या तारुण्यांतील स्वप्नांची दखल ठेवा." हें छोटसं वाक्य म्हणजे

---

* "Keep true to the dreams of youth."

जीवनाचा विद्युत्प्रवाह योग्य दिशेला लावून ध्येयदीप लावणारं एक बटनच आहे म्हणायला हरकत नाहीं. लग्नाच्या वेळीं 'सावधान' अशी मोठी धोक्याची सूचना देण्याचा प्रघात रूढ आहे, तद्वतच या सूचनेचा उपयोग आपण हरघडी करायला पाहिजे.

व्यक्तिजीवनांत तारुण्य हा वसंतऋतु आहे; मग या ऋतूंत कधींतरी दु:खी दृश्य दिसेल कां? सर्वत्र उल्हास, आनंदीआनंद, हास्याचे फवारे नि या दु:खी अवनीतलाचा विसर पाडणा-या दृश्यांची रेलचेल झालेली. अशा या सुखद प्रसंगीं अनुभवलेलीं स्वप्नें सुद्धा क्वचितच रडवीं असायचीं. हीं स्वप्नंच खरीं करून आपण दाखवूं लागलों—त्यांची सतत आठवण ठेवून आपण ध्येयमार्ग आक्रमिला—तर जगांतलीं कितीतरी दु:खं कमी होतील. मानवजातीवर विचारवंत तरुणांचा नि तरुणींचा हा एक मोठाच अनुग्रह होणार आहे, नाही कां?

# अधिक अभ्यास

(१) 'माझ्या ध्येयविषयक कल्पना' यावर एक भाषण तयार करा. पुढील मुद्यांचा उपयोग करा—

माझें लहानपण–त्यावेळची वृत्ति–घरची व शाळेंतील शिकवण–इतरत्र लाभणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शिकवण–कांहीं व्यक्तींशीं आलेले संबंध–ध्येयाची निश्चितता–बदल–कां? पुढील ध्येय केव्हां?–त्याचे मार्ग? –अव्यवहार्य!

(२) "एक निराळा स्वर्गच आपण या पृथ्वीवर निर्माण करूं." या उक्तींतील अर्थ स्पष्ट करणारा एक परिच्छेद लिहा.

(३) "जीवन ही एक लढाई आहे." अशा प्रकारच्या जीवनविषयक उक्ती गोळा करा.

(४) कविवर्य तांबे यांची 'ध्येय' ही कविता वाचा. भावार्थ थोडक्यांत लिहा.

१०

# धैर्याची आवश्यकता

आपल्या आयुष्यांत असे कितीतरी प्रसंग येऊन जातात कीं त्या त्या वेळीं आपण मोठ्या नेटानें व धैर्यानें कार्याला हात घातला असता तर आपलं आयुष्य आहे यापेक्षां सुखी झालं असतं. घटकाभर असं समजू कीं अशी गोष्ट फार थोड्यांच्या आयुष्यांत घडून येऊं शकेल. पण धैर्यानें मार्ग आक्रमणाऱ्याला आपला ध्येय-ध्रुव प्राप्त झाला नाहीं तरी त्या मार्गावरील धडाडीच्या प्रवासाचं समाधान कांहीं कमी नसतं.

"थोडा तरी अविचार करा" असा श्री. खांडेकरांप्रमाणें मला तुम्हांला उपदेश करायचा नाहीं. असा थोडासा अविचार करून जगाला एक बहुमोल विचारांचं भांडवल देणाऱ्या व्यापाऱ्याबद्दल माझी कांहींच तक्रार नाहीं. मला सांगायचं आहे तें दुसऱ्याच एका चिकित्सक वर्गाबद्दल. हे लोक बारकाईनें निरीक्षण करतात (असं ते म्हणतात); साधकबाधक गोष्टींची ते चर्चा करतात व करवितात; एकादी गोष्ट बरोबर आहे असा ठाम समज करून घेऊन मार्गही आंखतात, आणि नेमकी मार्गाला लागतांना माघार घेतात. याचं कारण चिनी तत्त्वज्ञानी कन्फ्युशिअस* यांच्या एका उक्तींत मोठं मार्मिकतेनं सांगितलं आहे. अमुक एक गोष्ट बरोबर आहे पण ती करवत नाहीं, असं होणं म्हणजेच त्या व्यक्तीच्या ठिकाणीं धैर्याचा अभाव आहे हें निश्चित. एका विशिष्ट सभेंत बोलायचें ठरलें, त्याप्रमाणें नांव जाहीर करून तयारी केली, भाषण खास परिणामकारक होणार अशी पूर्ण खात्री म्हणून वेळेवर सभागृहांत हजर पण राहिले आणि नांव पुकारतांच नेमकी माघार घेतली तर याला जरूर त्या धैर्याचा अभाव असणें याशिवाय दुसरं कोणतं कारण असणं शक्य आहे? दुसरीं कारणं असूं शकतील पण तीं अपवाद म्हणूनच.

---

* "To see what is right and not to do it is want of courage."

मनाचे प्रवास नेहमींच लांबलांबचे असतात. तें अनेक दूरदूरच्या व्यक्तींकडे एकाचं क्षणांत जाऊन येईल; अनेक योजना तैयार करील आणि त्यांची सार्थकता पटवून घेईल; पण हें मन लगेंच "कार्याला लाग" असा संदेश देईलच असं नेहमींच संभवत नाहीं.

तर सांगायचं काय कीं अमुक एक गोष्ट बरोबर आहे हें मनाला पूर्ण विचारांतीं पटलं कीं मग कार्याला हात घालायला माघार घेऊं नये. अशा माघारीमुळेंच अनेक व्यक्तींच्या आयुष्यांत नंतर पश्चात्ताप करायची पाळी आली आहे.

कार्य व कार्यपद्धति ठरवितांना खूप विचार करा--अनेकांचा सल्ला घ्या, अनुभवांचा विचार करा, इतरांच्या लिखाणाचा अभ्यास करा--व मग कोणतेंही कार्य चूक किंवा बरोबर आहे हें ठरवा. हें ठरविल्यानंतर मात्र भागूबाई बनूं नका. मोठ्या धैर्यानें कार्य स्वीकारा. या एका वृत्तींतच खरी कळकळ आहे व यांतच खरा प्रगतीपर मानवधर्म पाळण्याचं श्रेय आहे.

## अधिक अभ्यास

**(१) "थोडा तरी अविचार करा" या श्री. खांडेकरांच्या वचनाचा अर्थ स्पष्ट करा. मोठमोठ्या व्यक्तींच्या जीवनांतील उदाहरणें द्या.**

**(२) अंगीं धैर्य नाहीं म्हणून माघार घ्यावी लागली अशा तुमच्या आयुष्यांतील स्मृती लिहून काढा.**

**माघार घेतली नसती तर काय झालें असतें, यावर आपल्या मित्रांशीं चर्चा करा.**

**(३) पुढील पुस्तकें वाचा व धैर्याची आवश्यकता पटल्यामुळें त्या व्यक्तींच्या जीवनांत कशी क्रांती झाली याचें टिपण करा--**

**माझी कहाणी--श्री. पार्वतीबाई आठवले**
**पंडित जवाहरलाल नेहरु--श्री. आपटे गुरुजी**
**डी. व्हॅलेरा--प्राध्यापक ना. सी. फडके.**

११

# कृति व काल

६१३६ ... ७२५ ता. ०१.०१०८

पावसाळा सुरूं होऊन चांगला जरूर तितका पाऊस पडेल असा कयास बांधून शेतकरी पेरणी करतो. पाऊस पडतो, पिकं उगवतात नि वाढतात. त्यांना फुलं येऊन योग्य तीं फळं येतात अन् नंतर आपण पिकें हातीं आलीं असं समजतों. ही झाली शेतांतल्या पिकांची गोष्ट. इतर वृक्ष व वेलींनाही हा नियम लागू आहेच. असा एकादा वृक्ष कीं वेली पाहिली आहे का कीं फूल आल्याशिवाय फळ आलं आहे तिला ? तुम्ही म्हणाल, "हो, पिंपळाच्या व उंबराच्या वृक्षांचीं फुलं कांहीं पाहिलीं नाहींत." पण यांत निसर्गानें मुळींच चूक केली नाहीं. अत्यंत थोड्या वेळांत त्या फुलांचं फळ होत असल्यास तुमच्यासारख्या चंगीभंगी प्रेक्षकांच्या धांवत्या नजरेंत तें कसं भरणार ! सांगायचं काय कीं पानं, फुलं आणि मग फळं हा त्या वृक्षाचा अथवा वेलीचा जीवनक्रमच आहे.

इतकंच काय, पण तुम्ही भलत्या ऋतूंत वाटेल तें पीक पेरून पहा; त्या पिकांत थोडी तरी कमी मौज भासतेच. निसर्गनियमांवर मात करणाऱ्या मानवाला (अर्थात् तो स्वत:सुद्धां निसर्गाचाच एक भाग आहे ही गोष्ट निराळी) आतांपर्यंत वृक्षवेली वाढविण्यांत व पीक घेण्यांत यश आलं हें खरं, पण योग्य वेळीं योग्य अवस्था (पानें, फुलें, फळें) प्राप्त झाल्याशिवाय त्या वृक्षाचीं वा वेलीचीं फळं चाखतां आलीं नाहींत. अन् हेअर साहेब* तरी काय म्हणतात--वसंत ऋतूंत जर वृक्षाला फुलं आलीं नसलीं तर पावसाळ्यांत त्याला फळं यावीं अशी अपेक्षा करणं फुकट आहे.

निसर्गावर मात करणाऱ्या आपणा मानवांचं पण असंच आहे. योग्य काळीं योग्य गोष्ट आपल्या हातून झाली नाहीं तर आपल्या जीवनवृक्षाला गोड फळं लागणं अशक्य आहे.

---

* "Unless a tree has borne blossoms in Spring you will vainly look for fruit on it in Autumn."

लहान मूल हें एक रोपटं आहे. त्याला जरूर तें अन्न पुरवणं हें आपलं कर्तव्य आहे. या रोपाचा एक लहानसा वृक्ष तयार झाला कीं त्याकडे पुष्कळसे लोक आशाळभूतासारखे पाहूं लागतात आणि त्याला लवकर फळं यावीं अशी अपेक्षा करीत असतात. असं झालं म्हणजेच मग आज दिसताहेत असे निरनिराळे प्रश्न उद्भवतात--विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घ्यावा काय ? विद्यार्थ्यांनीं सिनेमा नाटकें पाहूं नयेत, कादंबरी वाचूं नये इत्यादि इत्यादि. आपापल्या मताप्रमाणें प्रत्येक व्यक्ति त्या लघु वृक्षावर फळं लादीत असते. त्या वृक्षाच्या निसर्गाकडे कुणी लक्षच देत नाहीं. मानवी वृक्ष सुद्धां किंचित् काल या मोठेपणानं खुललेला दिसतो पण आपण एक खुरटं झाड आहोंत याची जाणीव त्याला लवकरच झाल्याशिवाय रहात नाहीं.

या सगळ्याचं सार असं कीं प्रत्येक व्यक्तीनें योग्य वेळीं योग्य कार्य केलं म्हणजे नियमानेंच त्याला आपल्या कार्याचीं फळं चाखायला मिळतील. भलत्या वेळीं स्वत:विषयीं व दुसऱ्याविषयीं वाटेल त्या अपेक्षा करणं प्रगतीच्या दृष्टीनें घातक आहे.

## अधिक अभ्यास

**(१) वृक्षाचा जीवनक्रम व मानवाचा जीवनक्रम यांतील साम्य-विरोध दाखवणाऱ्या निबंधाचें टांचण तयार करा.**

**(२) वृक्षान्योक्ति, To Daffodils व सृष्टिशिक्षण (तांबे) या कविता वाचून मानव व निसर्ग यांचे संबंध स्पष्ट करा.**

**(३) ‘काल असेल तसें काम होईल’ या विधानाच्या विरुद्ध बाजूचें भाषण तयार करा.**

१२

# प्राप्तकर्तव्य प्रथम

आपल्या क्षणांक्षणांनीं बनलेल्या आयुष्यांत असे कितीतरी प्रसंग येतात कीं त्यावेळीं आपण काय करावें हें निश्चित करतां येत नाहीं. आपल्याकडील विद्यार्थ्यांचींच उदाहरणें घ्या ना ! अगदीं ८–१० वर्षांच्या विद्यार्थ्यापासून तों १८–२० वयाच्या विद्यार्थ्यांपर्यंत आपल्याला सर्वांचींच वृत्ति गोंधळलेली दिसून येईल; अन् हें जर नसेल, आणि तो निश्चित असा मार्ग आक्रमित असलेला असा दिसला तरी अशी खात्री बाळगा कीं त्यांतील फारच थोड्यांना त्यांचा मार्ग व ध्येय हीं पूर्ण आकलन झालीं आहेत. " झंडा ऊंचा रहे हमारा " असं तारस्वरांत ओरडणारा एखादा कॉंग्रेसभक्त युवक सहज म्हणून जाईल––

" हो, हो, या झेंड्याकरतां मी माझं सर्वस्व अर्पण करीन." अभिमान वाटत असतो त्याला त्याच्या या वृत्तीचा ! दुसरा एखादा युवक, " हिंदु राष्ट्र, हिंदु राष्ट्र " म्हणून मंत्र जपत आपल्या प्राणाची आहुति द्यायला तयार झालेला दिसेल; तिसऱ्याला समाजांत मूलतः बदल करण्याकरतां व क्रांति घडवून आणण्याकरितां आपला प्राण खर्ची घालावासा वाटेल. पण माझी खात्री आहे कीं यांच्याशीं जर आपण कांहीं काल बोललों नि विचारलं–" हें अगदीं खरं ना ? "—तर माझी मनोदेवता मला सांगते, तो 'हो' म्हणेल म्हणून आणि यानंतर बोलणं झालंच तर तें असं होईल––

" या क्षणाला सुद्धां प्राण द्यायची तयारी आहे का ? "

" तर ! वाटेल त्या वेळीं ! "

" अभ्यास, परीक्षा सोडून ? पालक, शिक्षक अन् पुढारी यांच्या मतांविरुद्ध ? "

" हो, सगळ्यांचा त्याग करून ! आमचे पुढारी नाहीं आम्हांला मागें रहायला सांगत. इतर राष्ट्रांतील विद्यार्थी नाहीं त्यांच्या राष्ट्रकार्यांत भाग घेत ? "

"समंजस पुढारी नाहीं असं सांगणार! निदान या अल्पवयी विद्यार्थ्यांना तरी असं सांगणार नाहींत. इतर राष्ट्रांची गोष्टच निराळी आहे. युद्धकालीं अथवा कांहीं बिकट प्रसंगीं विद्यालयें बंद झाल्यावर त्यांचं प्राप्त कर्तव्यच होतं असा भाग घेणं; आणि त्यांची अभ्यास करण्याची चिकित्साबुद्धि तुमच्यापेक्षां कितीतरी जागृत असते."

हा एक न संपणारा संवाद आहे. पण या विद्यार्थ्याला निश्चित उत्तर पुढें देतां येत नाहीं. "असं वाटतं म्हणून मी करतों" अशीं वाक्यं त्याच्या तोंडून बाहेर पडतात. याचं कारण असं कीं जें ध्येय असेल तें ध्येयच तो आपलं वाटेल त्या क्षणाचं कार्यक्षेत्र समजतो. निरनिराळ्या कार्यक्षेत्रांतून जात असतांना आपल्या ध्येयाला लागणारा मालमसाला, योग्य अनुभव वगैरे गोळा करायचे असतात. मार्ग बदलतील, मतें बदलतील, पण ध्येय बदलणार नाहीं अशी वृत्ति आपणांकडे दिसून येत नाहीं. मोठमोठ्या पुढाऱ्यांचीं ध्येयं बदललेलीं आपणांला दिसून येतात असं कांहीं लोक म्हणतील. पण मी त्यांना सांगेन की त्यांच्या चरित्राचा, कार्याचा आणि मतांतराचा अभ्यास करा म्हणजे दिसून येईल कीं त्यांनीं त्या त्या क्षणीं प्राप्त कर्तव्य करून आपला मार्ग चोखाळला आहे व पुढील मार्ग तयार केला आहे.

थॉमस कार्लाइल* यांचं सुद्धां म्हणणं असंच कीं प्रत्येकानें हाताशीं असलेलं प्राप्त कर्तव्य केलं तर त्यानंतरचं कार्य त्याला सुस्पष्ट दिसेल. लो. टिळकांनीं सुद्धां या गोष्टीवर खूप भर दिला आहे.

तर सांगायचं काय कीं दूरदृष्टीनें ध्येय ठरवा, ध्येयसृष्टी निर्माण करून अवलोकन करा व तो सारा लांब पल्ल्याचा मार्ग आक्रमतांना प्राप्त कर्तव्याला विसरूं नका. तरच ध्येयप्राप्ती नाहींतर ध्येयच्युति !

## अधिक अभ्यास

**(१) तुमचें राष्ट्रविषयक ध्येय काय? त्या ध्येयाप्रमाणें आपल्या राष्ट्राचें एक शद्बचित्र तयार करा. विरुद्ध बाजूंच्या लोकांशीं त्यावर चर्चा करा.**

(पुढील प्रश्न पान २५ वर पहा.)

---

* "Do the duty which lieth nearest to thee! The second duty will already have become clearer."

१३

# श्रम हा मानवधर्म

जोसेफ कॉन्राड हे एक प्रख्यात कादंबरीकार होते. विसाव्या शतकांतील आंग्ल वाङमयांत त्यांना मोठें मानाचें स्थान आहे. त्यांचं आरंभींचं जीवन मोठं खडतर गेलं; पण 'उद्योग-सतत उद्योग' हें ध्येय असणाऱ्या व्यक्तीला त्याचं काय ? त्यांनीं आपल्या आयुष्याचं सार एका वाक्यांतच* जणुं सांगून टाकलं आहे--मानव हा एक काम करणारा प्राणी आहे. तसा तो नसेल तर त्याला या जगांत अस्तित्वच नाहीं.

साधं, सरळ, सोपं वाक्य; पण किती अर्थ भरला आहे त्यांत, नाहीं ? आपल्याकडे सुद्धां अशा अर्थाचीं पुष्कळशीं वचनं आहेत. उद्योगी पुरुषालाच लक्ष्मी प्राप्त होते; उद्योग्याचें घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरतात--वगैरे. पण या वचनांतून एकच भाग दृष्टीस पडतो. जर व्यक्ति उद्योगी नसेल तर काय ? उद्योगी नसेल तर त्या इसमाला सुख लाभेल किंवा नाहीं ? जोसेफ कॉन्राड म्हणतात, अशा व्यक्तीला अस्तित्वच नाहीं.

खरं आहे त्यांचं म्हणणं. 'देईल धक्का तर मिळेल टक्का' असं आजचं जीवन आहे. आपण अनेक संकटांना तोंड देऊन आपलं जीवन

---

* "A man is a worker. If he is not that, he is nothing."

---

( पान २४ वरून पुढे चालू )

(२) "A service in any walk of life is service to the nation." यांतील अर्थ स्पष्ट करा. निरनिराळ्या लहान-मोठ्या व्यक्तींचीं उदाहरणें द्या.

(३) "मार्ग बदलतील, मतें बदलतील पण ध्येय बदलणार नाहीं." हें या निबंधांतील वचन तुम्हांला पटतें काय ? कसें ?

(४) "साधनानामनेकता !" ही उक्ति कोठली ? या उक्तीचा उपयोग विशेष कोणी केला ? कसा ?

यशस्वी करीत आहोंत या कल्पनेंतला आनंद उद्योगी व्यक्तीसच लाभूं शकेल. रॉबर्ट ब्राउनिंगनें एके ठिकाणीं म्हटलें आहे--

> " I was ever a fighter
> One fight more
> The best and the last."

याचा अर्थ तरी हाच. जीवन ही एक लढाई आहे--निकराची लढाई आहे. त्यांत न लढतां आयुष्य काढणंच कठीण आहे. न लढतां कंठलेलं आयुष्य म्हणजे दुसऱ्याच्या सहानुभूतीवर, दयेवर, भिक्षेवर जगण्यासारखें नाहीं का ? अशा व्यक्तीला या जगांत स्वतंत्र अस्तित्वच उरत नाहीं.

उद्योग–सतत उद्योग–हाच खरा जीवनमंत्र आहे. श्रम करण्याची तयारी ठेवा; मात्र श्रम ज्या कारणाकरतां अंगीकारायचे तें कारण मात्र उदात्त पाहिजे--कोणालाच जाचक न होतां स्वतःची उन्नति करायला उद्युक्त करणारं तें असावं.

## अधिक अभ्यास

**(१) ' देईल धक्का तर मिळेल टक्का ' असं आमचं जीवन आहे. या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा.**

**(२) ' श्रमाची सार्थकथा ' यावर पांच मिनिटें पुरेल असें एक भाषण तयार करा. पुढील मुद्यांचा उपयोग करा--**

**श्रम म्हणजे काय ?--सर्वांनाच त्याची जरूरी कां ?--समाजाशीं व्यक्तीचा संबंध--समाजोपयोगी श्रम व समाजविध्वंसक श्रम–मानवाच्या वृत्ति व त्यामुळें येणाऱ्या अडचणी--सार्थकता.**

**(३) स्वामी रामदास, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, निकोलाय लेनिन्, नेल्सन यांचीं चरित्रें अभ्यासा. त्यांनीं राष्ट्राकरतां--समाजाकरतां केलेल्या श्रमांना सार्थकता लाभली काय ? कशी ?**

१४

# कर्तव्य-मार्ग

आपण आपल्या सभोंवतीं नजर फेकली तर असं दिसून येईल कीं प्रत्येक व्यक्ति आपापल्या उद्योगांत निमग्न आहे. "काय चाललं आहे?" म्हणून सहज विचारून पहा; माझी खात्री आहे कीं त्यांतल्या पुष्कळशा व्यक्ती उत्तरतील--"कांहीं नाहीं, आपलं कर्तव्यकर्म!"

पण या उत्तरांतल्या 'कर्तव्य' शद्वाचं सगळं वैभव, सर्व सामर्थ्य पार हिरांवून घेण्यांत आलेलं दिसतं, नाहीं? अन् हें खरंच आहे. हा शद्वप्रयोग म्हणजे प्राणज्योत विजलेलं शरीर. याचा सरळ अर्थ 'निर्वाहाचा उद्योग' असा आहे. कर्तव्य या शद्वाचं तें विडंबनच वाटतं.

कर्तव्याचा मार्ग इतका सुलभ नाहीं. गोएटेनें म्हटल्याप्रमाणें प्राप्त कर्तव्याला हात घालायला एक प्रकारचा करारीपणा अंगीं असावा लागतो; कारण असं कीं या मार्गानं सुख लाभायची आशा थोडीच. लोकमान्य टिळक* म्हणतात कीं या कर्तव्यमार्गावर कोणी गुलाबपाण्याचे सडे शिंपडलेले नाहींत कीं त्यावर कधीं गुलाब पण फुलत नाहींत.

अगदीं खरं आहे त्यांचं म्हणणं. लोकमान्यांच्या आयुष्याचा विचार जर केला तर त्यांच्यासारख्या कर्तव्य-कठोर व्यक्तीनें दिलेला हा अभिप्राय अधिकच मोलाचा वाटतो. ते नेहमीं म्हणत असत कीं 'स्वार्थापेक्षां कर्तव्य जास्त प्रिय वाटणारी जितकी मंडळी देशांत निघेल तितकी चांगली'. या म्हणण्याचा अर्थ तरी हाच आहे कीं एकदां आपण कर्तव्याला हात घातला कीं अनेक संकटें यायला लागतील. मन स्वार्थाकडे ओढलं जाईल; शरीर हालअपेष्टा सोसायला तयार होणार नाहीं; अनेक पाशवी शक्ति आपल्याला चिरडून टाकायचा प्रयत्न करतील नि मग वाटेल कीं उगाच आपण हें कार्य अंगिकारलं. याकरतांच लोकमान्यांच्या या वचनाचं महत्त्व आहे.

* "The path of duty is never sprinkled with rose water nor do roses grow in it."

संकटांना भिऊन कर्तव्याचा मार्ग सोडणं वाईटच. "To fear difficulties is to lose manliness" असं कुठंतरी लोकमान्यांनीच म्हटलेलं मला आठवतं आहे. आपलं कर्तव्य बजावण्यांत एक प्रकारचा विशेष आनंद असतो. आपल्या वेदांतांत असं सांगितलं आहे कीं आपला देह केव्हांही नाशवंतच आहे. मग हा आपला मानवदेह खर्ची घालून अधिक उच्च असं ध्येय गांठतां येणार असेल, आपल्या राष्ट्राचं वैभव वाढेल असा कर्तव्यमार्ग स्वीकारतां येत असेल किंवा मानवधर्माचं एकादं तत्त्व पटवून देतां येत असेल तर त्या कर्तव्यमार्गालाच हात घालणं श्रेयस्कर नाहीं का ?

पण हा मार्ग स्पष्ट दिसायला पाहिजे. त्यावरील खांचखळगे आपण लक्षांत घ्यायला पाहिजेत. त्यावर सुखाचीं विश्रांतिस्थानं नाहींत याची खूणगांठ बांधली पाहिजे. आणि मग त्यावर पदक्षेप करण्यांत आपल्या कार्याचें यश अवलंबून आहे. प्रत्येकानें मनाला एक प्रश्न विचारूनच कार्याला हात घालावा.––" कर्तव्याग्नींत आनंदानें आपली आहुति देणार आहां का ? तरच हा मार्ग ! नाहींतर ' कर्तव्यकर्म ' ! "

## अधिक अभ्यास

**(१) " कर्तव्याग्नींत आनंदानें आपली आहुति देणार आहांत का ? तरच हा मार्ग, नाहीं तर ' कर्तव्यकर्म ' ! " या वाक्याचें स्पष्टीकरण करा.**

**(२) लोकमान्यांचं सर्वांत प्रसिद्ध वचन कोणतें ? त्याप्रमाणें त्यांनीं कोणकोणतीं कामें केलीं हें क्रमवार लिहा.**

**(३) ' विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें ' यावर लिहावयाच्या निबंधाचें टांचण तयार करा. त्यांतील मुद्यांप्रमाणें तुमचें वर्तन आहे काय ? यावर विचार करा; दुसऱ्यांशीं चर्चा करा. आपले ' गुणदोष ' यावर त्याच दिवशीं दैनंदिनींत नोंद करा.**

१५

# नशिबावर हवाला नको

मोटारीनें चैनींत जर प्रवास करावयाचा असेल तर 'मुम्बई–आग्रा' रस्त्यानें करावा. निरनिराळ्या घाटांतील मनोहर दृश्यं, मोठमोठ्या नद्यांवरचे अवाढव्य पूल, निसर्गांतील मनमोहक देखावे, अन् रस्त्यावरच्या सुखसोयी यांनीं मन उल्हसित झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

प्रवासांतच काय ! एकाद्या सुन्दरशा बागेंत जाऊन उभं राहिलं तर तेथली शोभा सुद्धां आपल्या मनाला भुरळ घालण्यास पुरेशी आहे.

पण अशी कल्पना करा कीं आपण एखाद्या बागेत नसून एकाद्या अरण्यांत आहोंत. तेथील रान आपण मोटारींत बसून तुडवीत नसून पायींच तुडवीत आहोंत. खूप खूप आपण हिंडतों आणि सुन्दरशा झऱ्या-नजीक विश्रांति घेत पहुडतों. पोटभर स्वच्छ पाणी पितों; मिळेल तसं एकादं कच्चं फळ खातों अन् एक तृप्तीचा ढेकर पण देतों. माझी खात्री आहे कीं मोटारींत बरोबर घेतलेल्या खाद्यपेयांपेक्षां या पदार्थांची चव कांहीं निराळीच पण मोठी मजेदार आहे म्हणून. याचं कारण म्हणजे तें कच्चं फळ मोठं रुचकर आहे असं नाहीं तर त्यांत आपल्या परिश्रमांचं चीज करण्याचं एक विशिष्ट सामर्थ्य आहे. या धडाडीनें मिळविलेल्या पदार्थांतच आपलं खरं समाधान असतं.

मानवी जीवनाचा मार्ग सुद्धां 'मुम्बई–आग्रा' रस्त्यासारखा सुरळीत असला व आपल्या भाग्यानें खूपशा सुखसोयी जरी लाभल्या तरी त्यांत हें विशिष्ट प्रकारचें सुख–समाधान लाभणें कठीण आहे. आपलं सुभाग्य आपणच मिळवलं पाहिजे. आपणाला जीवनमार्गावर जी शर्यंत धांवावयाची आहे त्यासाठीं सुभाग्य हें बक्षीस आहे. तें जिंकण्याचा प्रयत्न करण्यांतच आपलं कर्तृत्व आहे. ओहेन्रींनी* याचा मार्ग सुद्धां सांगितला आहे. त्यांच्या

*"Fortune is a prize to be won. Adventure is the road to it. Chance is what may lurk in the shadows at the roadside."

म्हणण्याचा आशय असा--धडाडी हा खरा मार्ग, धडाडीनें जीवनमार्गावर पाऊल ठेवून त्याच धडाडीनें पुढें जाणाराला यश हें ठरलेलेंच.

पण कांहीं प्रसंग असे येतात कीं कर्तृत्वावरचा--उद्योग व धडाडी यांवरचा--विश्वास उडून जातो व दैवावर विश्वास बसतो. याचं कारण असं कीं एखाद्याला विनासायास भाग्य लाभलेलें आपण पाहतों. ही भूमिका मात्र चुकीची आहे. जीवनमार्गाच्या बाजूला कोठेंतरी अंधुक छायेंत असले प्रसंग दबा धरून बसलेले असतात. ते असतीलच असा ज्याप्रमाणें भरंवसा नाहीं त्याचप्रमाणें असल्यास ते नेमक्या वेळेला येतील व आपणाला भाग्य प्राप्त होईल याबद्दलही कांहींच निश्चितता नाहीं--म्हणून ओहेन्री म्हणतात तोच भाग्यप्राप्तीचा खरा योग्य मार्ग आहे. कांहीं वेदांती लोक असल्या भाग्याला किंमत देणार नाहींत--त्यांना विरक्तींत सुख लाभेल. पण हेंही एक प्रकारचें भाग्यच आहे. आणि त्याचाही मार्ग मोठा धडाडीचा आहे. सर्वसंगपरित्याग व कमालीची अनासक्ति या गोष्टी मोठ्या धडाडीशिवाय कशा साधतील ? दैवानें भाग्य लाभणें अपवादात्मक पण उद्योगानें व धडाडीनें तें लाभणें हा नियम आहे.

## अधिक अभ्यास

**(१) 'उद्योग श्रेष्ठ कीं नशीब श्रेष्ठ' यावर वादविवाद करा.**

**(२) श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांच्या 'हिंदू समाज समर्थ कसा होईल ?' या पुस्तकाचा अभ्यास करा.**

**(३) "सर्वसंगपरित्याग व कमालीची अनासक्ति या गोष्टी मोठ्या धडाडीशिवाय साधतील का ?--" या प्रश्नाला उत्तर देण्याची जरूरी नाहीं. कां ?**

१६

# दुःखाची देणगी

वर्षाऋतु सुरू व्हावा; खूप पाऊस पडावा अन् पृथ्वीवर सर्वत्र हिरवंगार गवत उगवावं; सर्व बागा फुलाव्या नि सबंध निसर्गांत जणूं एक नवचैतन्यच भरल्यासारखं वाटावं ! हें वरून दिसणारं नयनमनोहर दृश्य जरा बाजूला केलं तर मनाला वाईट वाटेल; पण मनानें केव्हां ना केव्हां तरी सत्याची दूसरी बाजू पाहयला शिकलं पाहिजेच ना ? या हिरव्यागार गवतांतून पाण्याचीं डबकीं कितीतरी सांचलेलीं दिसतील; अनेक ठिकाणीं चिखल झालेला दिसेल; वरवर दिसणाऱ्या व पाण्यावर तरंगणाऱ्या पुष्पयुक्त लता, वेली आपलं लक्ष आकर्षून घेतील आणि त्या तडागांत पाऊल ठेवल्याबरोबर तेथील चिखलामुळें सर्वांगावर शहारे येतील, एक प्रकारची किळस वाटेल--हें पण सारं विसरून चालणार नाहीं. मानवी जीवन सुखकारक करण्यास अत्यंत जरूर असणाऱ्या पावसाचं हें असंच आहे. अनेक आल्हाददायक दृश्यांबरोबर चिखलाची घाण दृश्यं पण आपण स्वीकारलीं पाहिजेत.

पाऊस सारखा पडत असतांना तरी कुठं नेहमीं हवासा वाटतो ? त्यापासून त्रास व्हायचा तो होतोच. पण त्यांतही एक प्रकारचें सुख सामावलं आहे. प्रत्यक्ष मानवी जीवनाचंही असंच आहे. जीवनाचा वसंतऋतु बहरला म्हणजे असं वाटतं कीं जगांत दुःखं नाहींतच. क्षणकाल माणूस विसरूनच जातो कीं त्याचं जीवन हें एक सुखदुःख, आशानिराशा, यशापयश नि हर्षखेद यांनीं बनलेलं द्वंद्व आहे. अनेक सुखक्षण असे सांपडतील कीं त्यांचा उगम एखाद्या दुःखांतूनच झालेला आहे. पराभूताच्या दुःखांतूनच पुन्हां विजयश्री मिळविण्याचं चैतन्य जागृत होतं; अनेक वर्षें गुलाम म्हणून राहिल्यावरच स्वत्वाची--मानव्याची--कल्पना जागृत होते. दारिद्र्यानें पिडला असतांनाच संपत्तिमान् होण्याची कल्पना व्यक्तीला सुखाचे क्षण उपभोगायला आणून देते. याकरतांच असं म्हटलं आहे कीं

"Sorrow, like rain, makes roses and mud." दुःख आपणाला रडायला लावतें, आपली परिस्थिति अधिक बिकट करून ठेवतें, आपल्या सुखी जीवनांत अनेक खांचखळगे तयार करून त्यांतच आपणाला चिखल तुडवायला लावतें. पण या खांचखळग्यांतूनच आपल्या ध्येयांचे गुलाब फुलायचे असतात ना ? अशीं अनेक दुःखें येऊन गेलीं नि आपण त्यांतून योग्य रीतीनें मार्ग काढला म्हणजेच आपलं जीवन खरं यशस्वी झालं असं म्हणतां येईल. "जीवन ही एक लढाई आहे," असं जें म्हटलं आहे तें कांहीं उगाच नाहीं !

दुःख नेहमींच रडवं नसतं. कांहीं दुःखांतूनच आपल्या आकांक्षा जागृत होतात, त्यांना पालवी फुटते व त्या आकांक्षांना सुन्दर गुलाबपुष्पें आलेलीं आपण पहातों. किती असामान्य देणगी आहे, नाहीं या दुःखांची ?

## अधिक अभ्यास

**(१) "पराभूताच्या दुःखांतूनच पुन्हां विजयश्री मिळविण्याचं चैतन्य जागृत होतं," हें म्हणणें तुम्हांला पटतें काय ? तुमचें म्हणणें स्पष्ट करा.**

**(२) 'विद्यार्थिजीवनांतील सुखदुःखें' यावर एक निबंध तयार करा.**

**(३) अनेक हालअपेष्टा सहन करून जगांत कीर्ति मिळविणाऱ्या व्यक्तींचीं चरित्रें जरूर वाचा. उदाहरणार्थ-श्री. धोंडो केशव कर्वे, बेनिटो मुसोलिनी, डॉ. शरच्चंद्र चटर्जी.**

१७

# यशाची मीमांसा

अमुक एका व्यक्तीनं एकादं कार्य हातीं घेतलं नि यश मिळेपर्यंत तडीस नेलं तर आपण सर्वच त्याचं गुणगान करीत असतों, नाहीं? कोणत्याही राष्ट्रांतील व्यक्तींचा इतिहास पाहिला तर आपल्याला मोठ-मोठ्या यशापयशांचीं अनेक उदाहरणें सांपडतील. या यशापयशाचा वांटा आपण त्या त्या व्यक्तींच्या माथीं मारीत असतों अन् त्यांत विशेष चूक असं कांहींच नाहीं. पण या यशापयशाचीं कारणं आपण शोधूं लागलों, बारकाईनें त्यावर विचार केला तर आपणाला एक सत्य लगेच दिसून येईल कीं प्रत्येक यशाला अथवा अपयशाला कारण त्या त्या कालची परिस्थिति असते. कुणी मला असा प्रश्न विचारील कीं मोठमोठ्या व्यक्तींची अशाकरितां जरूरीच नाहीं काय?

अशी शंका येणं अगदीं साहजिक आहे. पण थोडं त्या व्यक्तीच्या चरित्राचं निरीक्षण करा. ती व्यक्ति आरंभीं नेहमींच सर्व बाबतीत लहान, अपक्व असलेलीं दिसेल. एका विशिष्ट वातावरणांत त्या व्यक्तीला नेऊन ठेवलं म्हणजे त्या व्यक्तीला एक विशिष्ट कार्य करावं लागतं; अन् हें कार्य करीत असतांना त्यांत यश लाभल्यावर किंवा अपयश आल्यावर त्या व्यक्तीचा जो स्वभावविशेष जनतेला दिसायचा, पटायचा तो दिसून येतो व आपण त्याला मोठा किंवा नादान ठरवीत असतों. योग्य ती योजना योग्य वेळीं अमलांत आणणं हें त्या व्यक्तीनं जर नीट ध्यानीं घेऊन कार्य केलं तर अपयशाचे प्रसंग फार थोडे.

सिंहगड सर करतांना वीर तानाजीनें योजलेली युक्ति व धडाडी; त्याच प्रसंगीं शेलारमामानें दाखविलेलें शौर्य; मराठ्यांशीं लढतांना ब्रिटिशांनीं योजलेल्या अनेक मुत्सद्दी युक्त्या; नेल्सननें योग्य त्या वेळीं क्रिकेट खेळूनही नेपोलियनसारख्या जगज्जेत्याचाही केलेला पराभव वगैरे गोष्टी तरी काय सांगतात? तर हेंच कीं कोणत्याही प्रसंगाचें यश हें

जसं व्यक्तीवर अवलंबून आहे तसंच, किंबहुना अधिक, त्या प्रसंगाच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. फिलिप् गुअदेल्ला* सुद्धां असंच म्हणतात. " यश ना ? तें मानव व क्षण यांच्या रासायनिक मिश्रणाच्या परिणामापेक्षां थोडंसं अधिक आहे."

इंग्रजींत 3 P's ना फार महत्त्व आहे. माहीत आहेत या तीन P कोणत्या त्या ? Period, Place and Person--काल, स्थल व व्यक्ति. या तीन गोष्टी योग्य प्रकारें, योग्य वेळीं, योग्य कामाकरितां एक झाल्या म्हणजे यशाची खात्री बाळगायला हरकत नाहीं. इतिहासाची छाननी करतांना या तत्त्वांचा खूप उपयोग करायला पाहिजे. व्यक्तींचं महात्म्य, युद्धाच्या पराभवाचीं कारणं, राष्ट्रांचे उदयास्त यांचा अभ्यास करण्याचो ज्या ज्या वेळां आपणाला संधि लाभेल त्या त्या वेळीं निःपक्ष–पातीपणानें आपण या तत्त्वांचा उपयोग करून निष्कर्ष काढला पाहिजे. अन् तुमच्या आयुष्यांत असे थोडे का प्रसंग येणार आहेत ! त्या वेळीं नीट विचार करा. या विचारांतच पुढील विचाराची व यशाची निश्चिति सामावलेली आहे याची खात्री बाळगा.

## अधिक अभ्यास

**(१) व्यक्तीचें यश कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे ? कां ? उदाहरणांनीं सिद्ध करा.**

**(२) 'अमक्या गोष्टींत मला मिळालेलें यश' यावर आपले अनुभव वर्णन करणारें एक मित्रास पत्र तयार करा.**

**(३) 'परीक्षेंत यश मिळविणें' नि 'जीवन यशस्वी करणें,' या दोन गोष्टी बऱ्याच भिन्न आहेत असं अनुभवी लोक सांगतात. याचा अर्थ समजावून द्या, व नंतर कै. हरीभाऊ आपटे, कै. डॉ. टागोर, व कै. गोविंदाग्रज, व हिटलर यांचीं चरित्रें अभ्यासा.**

---

* "Success is little more than a chemical compound of man with moment."

१८

# ध्येयानंतर मार्ग

जगाच्या इतिहासांत अनेक मोठमोठ्या घडामोडी होतात. मोठमोठीं सामराज्ये निर्माण होऊन तीं लयाला जायला सुद्धां खूप काळ लागेलच असें कांहीं नाहीं. एकाच व्यक्तीच्या आयुष्यांत अत्युच्च सुख व आत्यंतिक दुःख व जीवन नकोसं करणारी निराशा हीं पण कांहीं कमी धुडगूस घालीत नाहींत. पण इतक्याही अवस्थांतून आपण आपला मार्ग काढतों, जगतों, कांहीं तरी करतों व अखेरला या जगाला रामराम ठोकतों. हें सर्व सांगायचं कारण काय तर प्रत्येक व्यक्तीच असं सांगत असते कीं ती कांहीं ना कांहीं करीत असतेच.

पण तुम्हांला रिकाम्या जांवईबापूंची गोष्ट माहीत आहे ना? सासऱ्यानें कांहीं तरी उद्योग करायला सांगितला तेव्हां या राजश्रींनीं घराच्या भिंती खोदून काढायला सुरवात केली. हा उद्योग आहे; पण तो कांहीं तरीच नाहीं का? आपण जो उद्योग हातीं घेऊं तो चांगलाच असला पाहिजे; त्यांतील ध्येय पुष्कळशा लोकांचं हित साधणारं असलं पाहिजे.

आज सभोंवार दृष्टि फेकून पहा; अनेक मतांचा गलबला आपल्याला ऐकूं येईल. बरं; ही मतप्रणाली मामुली स्वरूपाची--म्हणजे दुसऱ्याचं ऐकून घेणारी--असती तरी हरकत नव्हती. पण ती असायची अत्यंत एकांगी; प्रत्येक प्रश्नाला दुसरीही एक बाजू असूं शकते याची जणूं त्यांना कल्पनाच नाहीं. इतकीं विचित्र मतं असलीं तरी सुद्धां एकवेळ चालतील. पण त्या मतांना प्रत्यक्ष कृतींत उतरवितांना बरीच काळजी घेतली पाहिजे हें जरी पुष्कळशा व्यक्तींना पटलं तरी बरंच कार्य होणार आहे.

जीवनांतील ध्येय निश्चित झालं, आपण कोठें आहोंत हें ठरलं म्हणजे मग प्रश्न उरतो, कोणत्या मार्गानें जावें हा. या ठिकाणींच होम्स*

* "The great thing in this world is not so much where we are, but in what direction we are moving."

यांच्या वचनाची आठवण होते. आपण कोणत्या परिस्थितींत आहोंत ही कांहीं विशेष महत्त्वाची गोष्ट नाहीं, तर महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण कोणत्या मार्गानीं जात आहोंत ही. आपला मार्ग आपल्या कृतीला श्रेष्ठता आणून देईल. असं म्हणतात कीं जगांत वाईट अशी कोणतीच गोष्ट नाहीं. पण त्या गोष्टीचा उपयोग मात्र चांगला--वाईट होऊं शकतो. याचा तरी अर्थ हाच नाहीं का, कीं कोणत्या दिशेनें आपलें कार्य चाललें आहे यावरच त्या कृतीचें महत्त्व अवलंबून आहे म्हणून.

आणि म्हणूनच विद्यार्थ्यांनीं आपल्या शालेय जीवनांतच मार्ग निश्चित करायला लागणारे धडाडी, बुद्धिमत्ता, चिकाटी, संघटनकुशलता वगैरे गुण आत्मसात् करायला सुरवात केली पाहिजे. हे गुण आपल्या संवयीच बनायला पाहिजेत. पण चूक होते ती कोणती, तर ध्येय-कार्य निश्चित होण्यापूर्वींच आपले कांहीं छोटे लोक चालायला लागतात; अगदीं एकांगी बनून मार्ग आक्रमितात; अन् खूप चालून गेल्यावर कळतं कीं मार्ग चुकला म्हणून. असं होणं म्हणजे आपलं आयुष्य फुकट घालवणं आहे--आयुष्य--पुष्प फुलायला सुद्धां मार्ग योग्यच नको का ?

## अधिक अभ्यास

**(१) "आयुष्यपुष्प फुलायला सुद्धां मार्ग योग्यच नको कां ?" या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा.**

**(२) 'ध्येय आणि जीवन' या विषयावर एक छोटेसें भाषण तयार करा. पुढील मुद्यांचा उपयोग करा--**

**व्यक्ति व भोंवतालची स्थिति--परिस्थितीमुळें ध्येयाची निवड --ध्येयाचें मूल्य--व्यक्तीच्या दृष्टीनें, समाजाच्या दृष्टीनें--ध्येयहीन जीवन--जीवनाचा खरा आनंद--जीवनाशीं ध्येयाचा संबंध--ध्येयप्राप्तीचे मार्ग व जीवनावर होणारा परिणाम.**

**(३) आपलें जीवन आपण कोणत्या मार्गानें घालवितों हें पाहण्याकरतां दैनंदिनींत पुढील मुद्यांवर साप्ताहिक समालोचन लिहित जा--**

**या आठवड्यांत केलेलीं लोकोपयोगी कामें;**

**या आठवड्यांत केलेलें वाचन व लेखन;**

**रिकामा वेळ कसा घालविला ?**

१९

# ही असंतुष्टता चालेल

जगांतील अनेक गंभीर उलाढाली पाहिल्या म्हणजे आपणांपैकीं कांहीं कांहीं व्यक्ती मजेनें म्हणतात–' माणसं होण्यापेक्षां खुशाल पशुपक्षी व्हावं नि स्वच्छंदपणें रानांत हिंडावं.' क्षणभर मौज वाटते, असं कांहीं ऐकलं म्हणजे. पण त्या वाक्यामागची व्यक्तीची मनोवृत्ति एकदां स्पष्ट झाली कीं त्यांतील माधुरी तर नाहींशी होतेच पण त्या व्यक्तिबद्दलचा आदरसुद्धां थोडा कमी झाल्याशिवाय रहात नाहीं.

कोणत्या एका विशिष्ट व्यक्तीबद्दल मी सांगतों आहे असं नाहीं; सर्वसाधारणपणें बहुतेकांच्याच मनांत केव्हां ना केव्हां हा विचार येऊन जातो. मानवाला बुद्धि, भावना असतांना, मानव जातींतील अनेक संशोधक मानवाचं आयुष्य सुखी करण्याचा हरघडी प्रयत्न करीत असतांना असा पशुपक्ष्यांच्या जीवनाचा हेवा वाटणारा विचार मानवी मनांत कां डोकवावा? मानवानें आपल्या इच्छेनुसार पशूंना आपले गुलाम केलें आहे हें काय त्या व्यक्तीला माहीत नसतें? पशू कितीही स्वच्छंदपणानें हिंडला, वाटेल तें करायची त्याला मुभा असली अन् त्याला खूप खूप समाधान लाभत असलं तरी एखाद्या मानवानें आपल्याला पण ती अवस्था लाभावी अशी इच्छा प्रदर्शित करणं म्हणजे मानवानं पुन्हां आपल्या पूर्वावस्थेंत जाण्यासारखं नाहीं का?

पण हे सारे प्रश्न कुणासमोर उभे राहतील? जो विचार करील त्याचे समोर–ज्याला असं वाटतं कीं आपण कांहीं तरी विशेष करण्याकरितां जन्मलों आहोंत, त्याचे समोर! समाजाच्या व म्हणूनच स्वतःच्या सुद्धां प्रगतीकडे लक्ष देणारी व्यक्ति ध्येय निश्चित करील, ध्येयप्राप्तीकरतां जिवाचं रान करील व तें ध्येय सफल झाल्यावर देखील स्वस्थ न बसतां पुढील अधिक उच्च ध्येयाकरितां कंबर कसायला कधींच माघार घेणार नाहीं. त्यांची वृत्ति समाधानी असेल यांत शंका नाहीं. पण समाधान

म्हणजे पुढील निष्क्रियता हा मात्र त्या वृत्तीचा अर्थ नव्हे. अशा दृष्टीनें या विचारवंत व्यक्ती नेहमीं असंतुष्टच असतात, अन् त्यांना जर विचारलं– "हें असलं नेहमीं असंतुष्ट जीवन तुम्हांला आवडतं? याचा कधीं कंटाळा येत नाहीं तुम्हाला?" तर या सगळ्या विचारवंत व्यक्ति अगदीं मिल्ल* सारखीं उत्तरं देतील–समाधानी पशु होण्यापेक्षां असंतुष्ट मानव झालेलं चांगलं अन् तसंच एखाद्या संतुष्ट मूर्खापेक्षां असंतुष्ट सॉक्रेटिस होणं अधिक चांगलं."

खरोखरच ही विचारसरणी म्हणजेच मानवजातीला लाभलेली संजीवनी आहे. मोठमोठ्या व्यक्तींच्या आयुष्यांतून या विचारसरणीला फाटा द्या; त्यांच्या आयुष्यांत मुळींच सार राहणार नाहीं, समाजाची प्रगति एकदम खुन्टेल अन् मग मात्र पशु व मानव यांत फारसा भेद राहणार नाहीं–पण हें जवळजवळ अशक्य आहे. मानवाचं आणि त्यांतून उच्च कोटीला पोचलेल्या आजच्या मानवाचं कार्यतृप्तीचं समाधान अगदीं अशक्य कोटींतली गोष्ट आहे. खरा मानव होणं व खरा मानव तयार करणं हें काम अव्याहत सुरूच राहणार. मग मानवाचीच असंतुष्टता कां स्वीकारूं नये?

## अधिक अभ्यास

**(१) "मानवाच्या प्रगतीला त्याची असंतुष्टताच कारण आहे." या विधानावर वादविवाद करा.**

**(२) सर चंद्रशेखर रमण, सर जगदीशचंद्र बोस, आइन्स्टाइन्, एडिसन या शास्त्रज्ञांचीं चरित्रें व शोध वाचा.**

**(३) "—म्हणजे मानवानें पुन्हां आपल्या पूर्वावस्थेंत जाण्यासारखेंच नाहीं कां?" या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.**

---

* "It is better to be a human being dissatisfied than a pig satisfied; better to be Socrates dissatisfied than a fool satisfied."

मराठी ग्रंथ संग्रहालय

२०

# कर्तव्यानंद

प्रत्येक व्यक्तीलाच असं वाटत असतं कीं आपण कांहीं ना कांहींतरी चांगलं करून नंतर हें जग सोडावं. पण जगाला तर राहूंच द्या, ज्या समाजांत तो वावरतो त्या समाजांतील आबालवृद्धांना चटका लावून जाईल इतकं साधं ध्येय सुद्धां गाठणं त्याला साध्य होत नाहीं. कितीतरी व्यक्ती या जगाला रोज रामराम करीत असतात; त्या सगळ्याकरितां समाज. हळहळतोच असं नाहीं आणि शिवाय जग सोडणाऱ्या व्यक्तीला तरी आनंद होतच असतो असंही पण निश्चित नाहीं.

'याचं कारण काय ?' असा जर कोणी मला प्रश्न केला तर मी सांगेन, 'याला कारण आपणच. आपण आपल्या जीवनाकडे पाहतांना स्वार्थी दृष्टि ठेवीत असतों; कोणतेंही कार्य करायचं असलं तर आपण किती प्रगति करूं शकूं याचा विचार करण्याऐवजीं आपणांस कीर्ति लाभेल किंवा नाहीं, मानापमान ठेवला जाईल किंवा नाहीं, कांहीं आर्थिक प्राप्ती होणार आहे कीं नाहीं याचीच आधीं चर्चा करूं.

दुसरी गोष्ट अशी कीं समाजांत ज्या अनेक व्यक्ती आपणांस भेटतात त्यांच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन सुद्धां दोषमूलक असूं शकतो. आपण स्वत्व विसरून त्या व्यक्तीच्या प्रश्नांचा व अडचणींचा विचार न करतां फायदा घेण्याकडे मात्र वृत्ति तत्पर ठेवतों. आपण वाईट ठरविलेली वृत्ति तीच बरोबर अशी ठाम समजूत असणं एक ज्ञानाचं लक्षण होऊं शकेल पण त्यामुळें इतर इसमाबद्दल अनादर होत असला तर ही वृत्ति पार विसरून जाणं अधिक श्रेयस्कर.

पण या गोष्टी नीटपणें घडत नाहींत नि अवलंबिल्याहि जात नाहींत. आणि साहजिकच आपण जग सोडून जातों तेव्हां आपणाबद्दल फार थोड्यांना हळहळ वाटते. पण तेच आपल्या स्वामी विवेकानन्दांनी*

* "आतां अशा प्रकारचीं कृत्यें कर कीं तूं हें जग सोडून जाशील त्यावेळीं सारें जग रडेल आणि तूं मात्र आनन्दांत राहशील."

म्हटल्याप्रमाणें कार्याला लागा, समाज आपणाला विसरणं शक्य नाहीं. सत्कार्याला हात घालून तें तडीस नेणं म्हणजेच व्यक्तीला चिरसमाधान लाभण्यासारखं आहे. ज्या व्यक्तीनें समाजाची खूप सेवा केली आहे, लहानमोठ्या गोष्टींत अत्यंत आपुलकीनें, प्रेमानें व एकनिष्ठेनें बऱ्याच लोकांना साधेल तितकी मदत केली आहे अशा व्यक्तींचा मृत्यु मोठा समाधानी असतो. हें जग सोडतांना त्यांना कर्तव्यपूर्तीचा आनंद झालेला असतो; पण अशी समाजसेवक व्यक्ति काळानें आपणांतून ओढून नेल्यामुळें कित्येक व्यक्तींना रडायला येईल. सगळ्या जगाला आपल्या मृत्यूबद्दल कमालीचें वाईट वाटेल असं काम करायला स्वामीजी सांगतात. हें सांगतांना त्यांनीं 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' अशी पुरुषार्थाची कल्पना मांडली आहे.

स्वामी विवेकानन्दांसारख्या सर्वस्वत्यागी साधूनें दिलेला हा कर्तव्य-संदेश म्हणजे आपला मोठा कर्मयोगच आहे. त्याचं अवलंबन केल्यास जगांतलीं कितीतरी भांडणं आपोआपच मिटतील; मतभेद नाहींसे होतील आणि समाजाचा प्रगतिमार्ग बऱ्याच सुखानें आक्रमिला जाईल. सारांश इतकाच कीं समाजाचं मंगल साधणारी आपली कृति पाहिजे.

## अधिक अभ्यास

(१) "समाजाचं मंगल साधणारी आपली कृति पाहिजे." अशा कृती कोणत्या ? त्यामुळें समाजाचं कोणतं मंगल झालं ?

(२) स्वामी विवेकानन्दांचीं अमेरिकेंतील व्याख्यानें वाचा.

(३) विवेकानन्दांच्या उक्तीप्रमाणें कोणत्या हिंदी व्यक्तींचे मृत्यु घडून आले ? एकाद्या प्रसंगाची थोडक्यांत हकिकत लिहा.

२१

# कृतीचें मूल्य-मापन

एका गांवांत एक खूप दानशूर गृहस्थ रहात होता. त्याचेकडे एकदां एक इसम आला नि म्हणाला, " महाराज, मी माझ्या दीर्घोद्योगाची आणि कौशल्याची आज तुम्हांला प्रचीति देणार आहे. आपणास योग्य वाटेल त्या मार्गानें आपण माझ्या परिश्रमाचें चीज करा." गृहस्थाची परवानगी मिळतांच त्यानें प्रयोगाला सुरवात केली.

त्यानें आपलीं नखें खूप वाढविलीं होतीं. त्यांना बारीक भोकें पाडून त्यांतून बाजरीचे, राळयाचे बारीक बारीक दाणे त्यानें फेकून दाखविले. प्रयोग संपल्यावर दानशूर गृहस्थानें आपल्या नोकराला बोलावून आलेल्या इसमास एक एक पायली बाजरी व राळे द्यायला सांगितलें. हें पाहून तो इसम आश्चर्यानें म्हणाला, "महाराज, हीच माझ्या कौशल्याची किंमत ? " गृहस्थ म्हणाले, " ही सुद्धां फार झाली, तुझ्या कार्याचा तुलाही उपयोग नाहीं आणि समाजाला तर मुळींच नाहीं. तुझे श्रम अगदीं अनाठायीं आहेत."

हें उदाहरण दिसायला साधं आहे. पण त्यांतून कितीतरी अर्थ निघूं शकतो. कार्याचं महत्त्व, मूल्य कशावर अवलंबून आहे याचं उत्तर देणारं हें उदाहरण आहे. कार्य कोणत्याही स्वरूपाचं असो, त्याचें मूल्य नुसत्या कौशल्यावर व व्यक्तीच्या मोठेपणावर ठरणारें नसून त्यांत व्यक्तीचं व समाजाचं किती हित साधलं जातं यावरच तें ठरणार आहे.

याच तत्त्वावरच महात्माजींचं खादीचं तत्त्वज्ञान त्यांनीं उभारलं आहे. हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन या व्यक्तींनीं राष्ट्रहित जर समाजापुढं ठेवलं नसतं तर आज समाजाकडून करविलेलीं प्रचंड कार्यें त्यांना साध्य झालीं नसतीं. आजच्या युद्धाच्या कालीं अनेक इंग्लिश तरुण प्राण अर्पायला तयार आहेत; याचं कारण सुद्धां बाह्यांगी तरी राष्ट्रहितच. चेंबर्लेनसारख्या मोठमोठ्या व्यक्तींनीं आपला मानापमान बाजूस सारून प्रधानगिरीचे राजिनामे दिले तें सुद्धां राष्ट्रहिताकरितांच. या झाल्या व्यक्तिविषयक कर्तृत्वाच्या गोष्टी.

शास्त्रानें सुद्धां कांहीं कमी समाजसेवा केली नाहीं. आज आपलं जीवन जें इतकं चैनीचं नि सुखसोयींचं झालं आहे तें कशामुळें ? तर मानवानेंच लावलेल्या अनेक शास्त्रीय शोधांमुळेच. परंतु समाजहित बाजूला ठेवून फक्त व्यक्तिहित साधण्याचा यत्न केला जातो तेव्हां मोठमोठाले शोध सुद्धां वाईट ठरतात. आज युद्धांत वापरलीं जाणारीं शस्त्रास्त्रें मानवाच्या शोधक बुद्धीचीं प्रतीकें आहेत यांत शंकाच नाहीं. पण त्यामुळें आज होणारी प्राणहानि तितकीच निंद्य आहे. समाजसुख साधण्याकरितां वापरली जाणारी मानवी शोधकबुद्धि आज कल्पनातीत अमानुष ठरत आहे. यांत्रिक शोधांचं सुद्धां असंच आहे. समाजाला सुख द्यायला निघालेलीं यंत्रें अनेक व्यक्तींना बेकार करून व्यक्तिसुख फक्त साधूं लागलीं अन् म्हणूनच अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्न उद्‌भवले. धार्मिक बाबतींतही कितीतरी लाटा त्यांनीं उठविल्या व रूढ कल्पनांना जोराचे धक्के दिले.

या सगळ्याचं सार काय तर जें काय करायचं असेल तें फक्त आपल्याच सुखाकरितां न करतां त्यांत समाजाला उपयुक्त असा बराच भाग आहे असं पाहण्याचं प्रत्येकानं ठरवावं. डॉ. ॲडलर्* म्हणतात--करण्यालायक कामं तींच कीं जीं समाजाला उपयुक्त आहेत.

## अधिक अभ्यास

**(१) महात्मा गांधींचें खादीचें तत्त्वज्ञान समजावून घ्या. श्री. बाळुभाई मेहता यांचें खादीमीमांसेवरील पुस्तक वाचा. "आजच्या यंत्रयुगांत या तत्त्वज्ञानाचा उपयोग आहे काय ?" यावर वादविवाद करा.**

**(२) "आधुनिक शास्त्रीय शोध" यावर एक टांचण तयार करा. व्यावहारिक ज्ञानकोशांतून माहिती मिळेल.**

**(३) "समाजसुख साधण्याकरतां वापरली जाणारी मानवी शोधकबुद्धि आज कल्पनातीत अमानुष ठरत आहे." हें म्हणणें तुम्हांला पटतें काय ? उदाहरणें देऊन आपलें म्हणणें स्पष्ट करा.**

---

* "The only worthwhile achievements of man are those which are socially useful."

## २२

# हें खरें राष्ट्रीयत्व

आज आपण कोणतीही व्यक्ति घेतली तरी त्या व्यक्तीला थोडचा-फार प्रमाणात नागरिकत्वाचे हक्क मिळाले असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल–मग ती व्यक्ति कोणत्याही धर्माची असो अथवा कोणत्याही मताची असो. अशा अनेक व्यक्ति एका भौगोलिक मर्यादेंत राहतात व त्या मर्यादित भागालाच आपला देश समजायला लागतात. पण ही विचारसरणी कायम टिकत नाहीं. लोकांचे नवनवीन कार्याकरितां रोज निरनिराळे संबंध येऊं लागतात; निरनिराळ्या देशांशीं दळणवळण सुरू होतें; भिन्न भिन्न धर्माचे लोक एकत्र येऊं लागतात आणि या अनेक घडामोडींचा लोकांच्या मनावर परिणाम होऊन निरनिराळीं तत्त्वज्ञानें प्रसृत होतात. आणि खरं सर्व मानवांचं व प्राणिमात्राचं हित साधणारं तत्त्वज्ञान बाजूलाच राहतं.

हें सांगायचं कारण असं कीं कोणत्याही एका समाजाला स्वतःस राष्ट्र म्हणवून घ्यावयाचें असल्यास राष्ट्राचे गुणधर्म सुद्धां निश्चित ठरविले पाहिजेत. नुसत्या धर्मावरच जर राष्ट्र बनत असेल तर बहुतेक युरोप एक राष्ट्र म्हणून संबोधायला हरकत नाहीं. अमेरिकेनें सुद्धां युरोपशीं खास सहमत होणं जरूर आहे. चीन–जपान मिळून एक राष्ट्र करणं अत्यंत हिताचं होईल. पण असं घडून येत नाहीं. एकाच धर्माचे लोक एक-मेकांशीं लढतांना आज आपण स्पष्ट पहात आहोंत. आपल्या हिंदी इतिहासांत सुद्धां असली उदाहरणं थोडीं नाहींत. नुसत्या भौगोलिक मर्यादांनीं पण राष्ट्राची कल्पना स्पष्ट करतां येणार नाहीं. कारण या मर्यादा कोणाच्या तरी अतिक्रमणानें बदलणाऱ्या आहेत––मग तें अतिक्रमण हिंसेनें असो वा एकाद्या नवविचार प्रणालीनें असो. आज हा प्रयोग युरोपमध्यें सर्रास सुरू आहे.

आपला भारतवर्षच पहा ना ! कशा मर्यादा बदलत गेल्या ? आपल्या महाराष्ट्राला 'महाराष्ट्र' म्हणून आज एका राष्ट्रांत स्थान

आहे. घर अनेक खोल्यांचें असतें म्हणून प्रत्येक खोली कांहीं घर नाहीं, तद्वतच राष्ट्र अनेक प्रान्तांचं असलं तरी प्रत्येक प्रांत कांहीं राष्ट्र नाहीं. तर सांगायचं काय कीं असल्या मर्यादांनीं राष्ट्र तयार होतेंच असं नाहीं.

लोकमान्यांनींच* एके ठिकाणीं म्हटलं आहे कीं आपलीं भिन्न भिन्न मतें सोडून लोक एक होतात तेव्हां त्यास राष्ट्र म्हणतात. प्रत्येक बाबतींत एकवाक्यता कोणत्याच समाजांत आढळणार नाहीं. कारण व्यक्ती तितक्या प्रकृति हा निसर्गसिद्ध नियम अद्यापि अबाधित आहे. पण एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जर त्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीला आली, आली नसल्यास आणून देण्याचा अविरत प्रयत्न पुढाऱ्यांनीं केला तर तो समाज एकराष्ट्र म्हणून संबोधण्यास हरकत नाहीं. आपल्या राष्ट्राची इभ्रत राखायला लागणारी एकवाक्यता असलीच पाहिजे.

## अधिक अभ्यास

(१) कै. डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांनीं लिहिलेलें 'Greater India' हें पुस्तक वाचा. या पुस्तकाचें श्री. साने गुरुजींनीं 'स्वदेशी समाज' या नांवानें भाषांतर केलें आहे.

(२) 'राष्ट्रीयत्वा' बद्दलच्या निरनिराळ्या कल्पना नीट समजावून घ्या. त्यावर विचार करा. जी पटेल ती तुमच्या शद्बांत मांडा.

(३) "आपल्या राष्ट्राची इभ्रत राखायला लागणारी एकवाक्यता असलीच पाहिजे." या वाक्यांतील अर्थ हिंदुस्थानच्या इतिहासांतील उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

---

* "It is the spirit of nationality that makes the whole nation one."

२३

# हा पहा स्वदेशाभिमान !

कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास आपण डोळ्यांखालून घातला तर आपणांस असं दिसून येईल कीं अनेक व्यक्तींनीं स्वदेशाभिमानाप्रीत्यर्थ आपल्या सर्वस्वाची होळी करायला मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. अशा या हुतात्म्यांकरतां आपली मान सदा नम्रच असणार, नाहीं कां ?

पण हें प्राण देणं नि घेणं इतक्या पराकोटीला पोहोंचलं कीं अनेक मोठमोठ्या लढाया व युद्धें झालींत; कोट्यावधी लोक नाहक मारले गेले; ज्या देशावर आपल्या प्राणापलीकडे प्रेम केलं तो देश उध्वस्त झालेला पहायला पण मनाची तयारी झाली; ठार मारतांना स्त्रीपुरुष, मुलगा–मुलगी, असा भेद राहिला नाहीं; अत्यंत क्षुल्लक कारणांकरतां खून पडूं लागले. या सर्व गोष्टी एरव्हीं घडल्या असत्या तर त्यांत आश्चर्य नाहीं; पण हें सर्व घडलें व घडत आहे कशाच्या नांवावर–तर स्वदेशाभिमानाच्या नांवावर !

ही वृत्ति जी आज बोकाळली आहे त्या वृत्तीला धरूनच बर्ट्रंड् रसेल यांनीं स्वदेशाभिमानाची छोटीशी पण आजच्या घाणेरड्या वृत्तीची द्योतक अशी व्याख्या केली आहे. ते म्हणतात*––स्वदेशाभिमान म्हणजे साध्या क्षुल्लक कारणांकरितां दुसऱ्यास ठार मारण्याची किंवा स्वतः मरण्याची तयारी असणें.

बर्ट्रंड रसेल हे आजचे जगांतील एक निर्भीड टीकाकार आहेत. त्यांचीं नवमतें लोकांना हलवून जागं करतात; आरंभीं बेछूट वाटणारे बर्ट्रंड् रसेल आज एक गाढ तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. अशा एका महनीय व्यक्तीचं हें मत !

जर्मनीचा स्वदेशाभिमान घ्या, इंग्लंडचा घ्या किंवा आपल्याकडील पूर्वेतिहासाचा घ्या; सगळ्यांची धांव कोणीकडे ?––तर आपल्या राष्ट्राचं

---

* "Patriotism is the willingness to kill and be killed for trivial reasons."

साम्राज्य वाढविण्याकडे ! दुसऱ्याचं स्वातंत्र्य हिरावून घेणं म्हणजे कांहीं स्वदेशाभिमान नाहीं ! दुसऱ्या व्यक्तींना, आपल्या एककल्ली मताप्रमाणें वागत नाहींत म्हणून ठार करण्याची जी एक अमानुष पद्धति आज कांहीं राष्ट्रांत बोकाळली आहे, ती स्वदेशाभिमानी वृत्ति आहे असं सांगण्यांत येतं ! किती नीच कोटीला आलेला हा स्वदेशाभिमान !

"राष्ट्राकरतां माझे प्राण द्यायला मी तयार आहें !" ही प्रतिज्ञा अंगावर शहारे आणते; त्या व्यक्तीवर आपला लोभ जडतो; मनांत कुतूहल उत्पन्न होतं; आदरानें मान खालीं लवते, पण कोठपर्यंत ?––ती व्यक्ति कार्याला हात घालीपर्यंत. प्रत्यक्ष कार्य पाहिल्यावर असं वाटतं कीं फार क्षुल्लक कारणाकरतां हे लोक मारायला व मरायला तयार होतात. दिसायला क्षुल्लक पण परिणामीं भयंकर असं वीर बाबू ग्येनूचं कृत्य विरळाच !

स्वदेशाभिमान पाहिजे तो असा.

## अधिक अभ्यास

**(१) श्री. मुरलीधर नारायण गुप्ते (Bee) यांच्या पुढील ओळींचें स्पष्टीकरण करा––**

**"तें स्वातंत्र्य खरें न, अपुलीं जें तोडितें बंधनें**
**अन्यांच्या पदशृंखलांस बघतें निष्कम्प ऐशा मनें;"**

**(२) वीर बाबू ग्येनूची माहिती मिळवा आणि एक छोटेसें व्यक्तिचित्र लिहा.**

**(३) खरा स्वदेशाभिमान कसा असतो, यावर शिक्षकांशीं वा इतर अनुभवी लोकांशीं चर्चा करा; आणि नंतर आपलें मत निश्चित करा.**

२४

# स्वातंत्र्य

आजचं युगच स्वातंत्र्य-युग आहे असं म्हणायला हरकत नाहीं. कोणत्याही राष्ट्रांत तुम्ही जा; तेथें व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असल्याचा टाहो दाही दिशांनीं ऐकायला यायचा. व्यक्तीचा विकास पाहिजे असा उपदेश करायलाही ते कमी करणार नाहींत. जर्मनी, इटली, रशिया येथें तर हुकुमशाही राज्यव्यवस्था आहे असा समज आहे ना? हिटलर व मुसोलिनीसुद्धां या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो म्हणतील अन् मग हळूंच सांगतील कीं व्यक्तीला वाटेल तें करण्याची मात्र परवानगी नाहीं.

याला कांहीं मी खरं स्वातंत्र्य म्हणणार नाहीं. खरं स्वातंत्र्य महात्माजी म्हणतात* त्याप्रमाणें, व्यक्तीला चूक करण्याचं सुद्धां स्वातंत्र्य देत असतं. चूक होणं हें मानवधर्माला धरूनच आहे, नि म्हणूनच व्यक्तीच्या हातून चुका होणारच, त्यांतून ती व्यक्ति प्रत्यक्ष ज्ञान मिळविणार अन् आपल्या अनुभवांचा जगाला फायदा देणार. नेमकी हीच विचारसरणी हे हुकुमशहा आपल्या वर्तनाला लावून घेतात आणि म्हणतात कीं त्यांनीं सर्व अनुभव घेतले असल्यामुळें ते जे कांहीं सांगतात तेंच फक्त राष्ट्राच्या खरं हिताचं असतं; जणूं बाकीच्यांना अनुभव नाहीं कीं राष्ट्रहित पाहण्याची त्यांची लायकी नाहीं !

व्यक्तिस्वातंत्र्याला असली विचित्र मर्यादा घालणाऱ्या व्यक्तींकडे पाहिलं कीं असं वाटतं कीं महात्मा गांधींची स्वातंत्र्याची कल्पना किती मानवी स्वरूपाची आहे ! चूक करण्याची मोकळीक ज्या स्वातंत्र्यांत नाहीं तें स्वातंत्र्य स्वीकारण्यांत कांहींच अर्थ नाहीं. वरवर विचार करणाराला हा चूक करूं देण्याचा सिद्धांत मोठा विचित्र व उपेक्षणीय वाटतो. पण तोच खरा लोकशाहीचा गाभा आहे--त्यांत अतिशयोक्ति मात्र नसावी.

---

* "Freedom is not worth having if it does not connote freedom to err."

## जीवनविकास

चूक करण्यांत गुन्हा नाहीं. पण तीच चूक पुन:पुन्हां आपल्या हातून घडणं हा मात्र दोष आहे. नुसताच चुका करण्याचा अधिकार जनतेस देऊन टाकला तर आजची राज्यव्यवस्थेची सुसंघटना तेव्हांच खिळखिळी होईल. प्रत्येक व्यक्ति चूक करण्याकरितां रोज नवीन नवीन क्षेत्रं निर्माण करील अन् आपले व्यवहार म्हणजे चुकांचाच एक बाजार होईल. विद्यार्थी शिकतांना तर चुका करतीलच पण परीक्षेंतही करतील व शिवाय स्वातंत्र्यवादी बनून त्याचा कांगावा करतील. राजकारणी अन् समाजसुधारक धुरंधर काय कमी घोटाळे निर्माण करतील ? व्यापाऱ्यांची नीति, सावकारांच्या--श्रीमंतांच्या इभ्रतीच्या कल्पना कोणत्या थराला जाऊन भिडतील ? सांगायचं इतकंच कीं सर्वत्र बजबजपुरी माजली जायला फारसा कालावधि लागणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य संपूर्ण देऊनही हे दोष टाळतां येणं अशक्य नाहीं पण त्याप्रमाणें शिक्षक–पालक–विद्यार्थी यांनीं एकत्र येऊन धोरण ठरविलं पाहिजे, तरच महात्माजी म्हणतात त्याचप्रमाणें स्वातंत्र्य देतां येईल व तें उद्यांच्या पिढीला उपभोगतां येईल.

## अधिक अभ्यास

**(१) "चूक होणं हें मानवधर्माला धरूनच आहे," या अर्थाची इंग्रजी उक्ती कोणती ? यावर स्पष्टीकरणार्थ एक परिच्छेद लिहा.**

**(२) मोठमोठ्या लोकांच्या हातून सुद्धां चुका होतात; पण ते सर्वसाधारण माणसांसारखे गप बसत नाहींत. आपल्या सर्व चुका जाहीर रीतीनें कबूल करतात. अशा व्यक्तींचीं नांवें द्या. त्यांनीं कबूल केलेल्या चुका कोणत्या ? त्यांच्या चरित्रांतून किंवा आत्मचरित्रांतून माहिती मिळवा.**

**(३) तुमच्या हातून घडलेल्या चुकांची नोंद करा. सुधारण्याकरतां तुम्ही कोणत्या प्रकारें संयम केला याची सुद्धां दैनंदिनींत नोंद करा.**

२५

# स्वातंत्र्याच्या मर्यादा

आपला सर्वांचा स्वभावच असा आहे कीं आपणांपैकीं कोणालाच नेहमी एकटं राहणं आवडणार नाहीं. केव्हां ना केव्हां तरी आपल्या मित्रपरिवारांत किंवा कुटुंबियांत जाऊन बसावं, चार गोष्टी सांगाव्या, ऐकाव्या; सुखदु:खांत आपण वांटेकरी व्हावं अन् आपल्या मनाची तहानभूक शमवावी. याकरतांच असं म्हणतात कीं मानव हा समाजप्रिय प्राणी आहे.

हा मानवी स्वभाव जर ध्यानीं घेतला तर एक प्रश्न असा उद्भवतो कीं ज्या समाजामध्यें ही व्यक्ति आपलें आयुष्य घालवीत असते त्या समाजाचीं बंधनें त्या व्यक्तीवर प्रथम लादण्यांत यावींत कीं व्यक्तीच्या हिता-हिताचा प्रश्न आधीं सोडवून, त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा प्रश्न लक्षांत घेऊन समाजावर बंधनें लादावींत. नेमका याच ठिकाणीं सामाजिक हित कीं व्यक्ति-स्वातंत्र्य असा मूलगामी प्रश्न उद्भवतो. या प्रश्नाचें उत्तर देणें जितकें सोपें आहे तितकेंच कठीण पण आहे. याचं कारण असं कीं हें व्यक्तिस्वातंत्र्य कोणत्या मर्यादेपर्यंत असावें हें ठरविणार तरी कोण? एखादा उत्तर देईल कीं समाजानें? समाजाला असला विचार करण्याकरतां तरी कोणी पाहिजेच ना? याला कोणी तयार करायचा? समजा ती व्यक्ति स्वत:च पुढें आली तर सर्वांनी त्या व्यक्तीचं ऐकावंच असं कांहीं अगोदरच ठरलेलं नाही. यावर कोणी स्पष्टीकरण करतांना म्हणेल--" अं: ! त्यांत विशेष काय आहे? शेत नांगरून तयार आहे, बीं आणून ठेवलं आहे; पाऊस पण पडला आहे; आतां फक्त कोणी तरी पुढें येऊन पेरणी करावी अन् त्यांतून पीक काढावं." दिसायला सोपा असा हा दृष्टान्त आहे. पण जरा चिकित्सक दृष्टीनं त्याचा विचार केला तर आपल्याला असं दिसून येईल कीं प्रत्येक कार्याला व्यक्तीच्या सहकार्याची आवश्यकता भासली आहे; अन् आपल्या प्रश्नाचं उत्तर यांतच सामावलं आहे असं मला वाटतं.

व्यक्तीला स्वातंत्र्य जरूर द्यायला पाहिजे. पण ती व्यक्ति समाजांतच कार्य करीत असल्यामुळें समाजहिताच्या विरुद्ध त्या व्यक्तीनें जातां कामा नये. तसें होऊं लागल्यास तावडतोब बंधन घातलें पाहिजे. लॉइड् जॉर्ज* यांनींसुद्धां असंच मत दिलं आहे. व्यक्तिस्वातंत्र्याला अशीं बंधनें--बांध घातले आहेत पण त्याच्या मर्यादा ठरलेल्या नाहींत. एका देशाच्या मर्यादा संपून दुसरा देश ज्या ठिकाणाहून सुरूं होतो त्याला मर्यादा (frontiers) म्हणतात. अशी मर्यादा मात्र व्यक्तिस्वातंत्र्याला नाहीं.

व्यक्तिस्वातंत्र्य हा एक सामाजिक हिताकरतां केलेला नियम आहे असं समजलं म्हणजे मग त्याकरतां लादलेलीं बंधनं फारशीं जाचक होत नाहींत. पण एका व्यक्तीच्या इच्छेवर चालणारा समाज मात्र जरा निराळ्याच स्वरूपाचा असतो. त्याठिकाणीं हमखास सांगतां येईल कीं तेथील व्यक्तिस्वातंत्र्याला बंधनें नसून (restraints) मर्यादा आहेत म्हणून.

व्यक्तीचा विकासच मुळीं समाजामुळें होत असतो. जास्तींतजास्त स्वातंत्र्य उपभोगून आपल्या समाजाचं हित साधणं हाच खरा व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगण्याचा अर्थ.

## अधिक अभ्यास

**(१) "व्यक्तीच्या विकासाला समाजाची जरूर नाहीं." यावर वादविवाद करा.**

**याकरतां आचार्य जावडेकर यांनीं लिहिलेलें 'लोकशाही' हें पुस्तक वाचा.**

**(२) भौगोलिक मर्यादेसारख्या मर्यादा व्यक्तिस्वातंत्र्याला घालतां येत नाहींत. हें खरें आहे काय ? कसें ?**

**(३) तुम्हांला संपूर्ण व्यक्ति-स्वातंत्र्य दिलं तर तुम्ही कोणकोणत्या गोष्टी प्रथम हातीं घ्याल ? कारणें स्पष्ट करा.**

---

* "Liberty has restraints but no frontiers."

क्र. ६७३६

२६

# मनाचे प्रश्न

कांहीं कांहीं प्रसंगच मोठे मजेदार असतात. एखाद्या व्यक्तीनें आपल्या समोर यावं अन् प्रश्नांचा खूप भडिमार करावा–आणि मजा अशी कीं त्या अनेक प्रश्नांपैकीं एकालाही उत्तर देण्याची आपल्या मनाची तयारी नसते. याचं कारण तरी काय ? सर्वच प्रश्न इतके कांहीं गंभीर नसतात कीं त्यापैकीं एकाही प्रश्नाचं उत्तर माहीत असू नये ! सर्वच प्रश्न उपेक्षणीय असतात असंही नसतं ! मग आपल्या मनाची अशी स्थिति कां व्हावी ?

खरं सांगायचं म्हणजे प्रश्नाचा नि उत्तराचा संबंधच असा विचित्र आहे. प्रश्न विचारायला वेळ तर थोडा लागतोच पण त्यावर विचारशक्ति नेहमींच खर्च करावी लागते असं मात्र नाहीं. जी व्यक्ति कधीं फारसा खोल विचार करीत नाहीं किंवा करूं शकत नाहीं; जीवनामध्यें क्षणाक्षणाला जे अनेक प्रश्न उद्भवतात त्यांतून मार्ग काढण्याची ज्या व्यक्तीची प्रवृत्ति नाहीं अशी व्यक्ति नेहमीं अनेक प्रश्न विचारूं शकेल.

या व्यक्तीबद्दल विशेष असं कांहींच नाहीं. मूर्ख व्यक्तीचं मात्र आपण जरूर परीक्षण करायला पाहिजे. मूर्ख माणूस केव्हां काय बोलेल व विचारील याचा कधीं अंदाजच करतां येणार नाहीं. त्यानें विचारलेल्या मूर्खपणाच्या प्रश्नांत सुद्धां कांहीं प्रसंगीं इतका गूढ अर्थ भरलेला असतो कीं एखाद्या शहाण्या–विचारी व्यक्तीला सुद्धां त्याचें उत्तर ताबडतोब देणें कठीण जावें. “ माझा नि त्याचा काय संबंध ?” “ मला जगाची कां पर्वा असावी ? ” अशा स्वरूपाचे किती तरी प्रश्न विचारले जातील अन् त्यांचीं उत्तरें समजावून सांगतां सांगतां आपला बराच वेळ निघून जाईल. आणि इतकेंही करून कार्यभाग साधेलच असं मात्र नाहीं. निकोलाय् लेनिनसारख्या समाजाच्या सर्व थरांतून वावरलेल्या क्रांतिकारकानें उगाच

नाहीं अभिप्राय दिला ! त्यांचं म्हणणं* असं कीं बारा शहाण्या माणसांना उत्तरं देतां येतील यांपेक्षां अधिक प्रश्न एकादा मूर्ख एका मिनिटांत विचारूं शकेल.

मूर्खानें विचारलेले सारे प्रश्न मूर्खत्वदर्शकच जरी असले तरी त्यांत सुद्धां शहाण्या माणसांना वेड्यांत काढू शकणारे मुद्दे कांहीं प्रसंगीं सांपडतात. आणि एवढ्यावरूनच असं म्हणावंसं वाटतं कीं लेनिननें मूर्खाची टिंगल करण्याकरितां कांहीं हे शब्द उच्चारले नाहींत. सर्वसाधारण माणसाला जी व्यक्ति मूर्ख वाटते अशाच व्यक्ती समाजांत अधिक सांपडायच्या. सामाजिक अनुभवानें त्यांच्या मनांत अनेक चुकीच्या वा बरोबर कल्पना रुजायच्या व त्यावर आधारलेले अनेक प्रश्न त्यांनीं एकादे वेळीं विचारले तर ही सर्वसाधारण व्यक्ति त्याला हंसेल; पण विचारवंत ? त्यावर खूप विचार करायला लागतील; त्याकरतां मार्ग निघतात का पाहतील; असेच उद्‌गार येण्याकरतां काय कारण घडलें असेल याचा शोध करतील नि मग त्याला कृतीनेंच उत्तर देतील नि त्याला आपल्याबरोबर शहाणा म्हणून चालवितील. हे प्रश्न म्हणजे त्यांच्या विचार-पेटिका उघडणाऱ्या किल्ल्याच जणूं !

## अधिक अभ्यास

**(१) कांहीं कांहीं वेळां आपलें मनच आपल्याला प्रश्न विचारीत असतें. तुम्हांला असा कधीं अनुभव आला आहे ? त्यांतील दोनतीन प्रश्न नि तुम्ही दिलेलीं उत्तरें लिहा.**

**(२) "हे प्रश्न म्हणजे त्यांच्या विचार-पेटिका उघडणाऱ्या किल्ल्याच जणूं !" या वाक्याचें स्पष्टीकरण करा.**

**(३) मनाचे व्यापार कसे चालतात हें सांगणारीं बरींच पुस्तकें आहेत. लहानपणीं सर्वच समजणार नाहींत; पण प्राध्यापक फडके यांचें 'मानसमंदिर' हें पुस्तक समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यास हरकत नाहीं.**

---

*"One fool can ask more questions in a minute than twelve wise men can answer in an hour."

२७

# समाज व व्यक्ति

एकाद्या व्यक्तीनें दारुबाजांच्या गटांत सांपडावें व त्यांच्या अत्याग्रहानें, बहिष्काराच्या धाकानें तें अपेय पान करावें; किंवा एकाद्या निर्व्यसनी प्रौढ विद्यार्थ्यानें आपल्या बेछूट विद्यार्थ्यांच्या सहवासांत एकादें अयोग्य कृत्य करावें आणि या अशा दोघांही व्यक्तींनीं बाहेर येऊन सांगावें कीं आम्ही खरे निर्लेप आहोंत; या दोन व्यक्ती निर्लेप होत्या यांत शकाच नाहीं, पण त्यांच्या मनाची खंबीरता मात्र अढळ नव्हती हेंहि तितकेंच सत्य आहे.

अन् याकरतांच 'सत्संगतीचा महिमा कळेना' असं जें म्हणतात तें उगाच नाहीं. आपल्या मित्रांच्या परिवारावरून आपण ओळखलें जातों हें प्रत्येक व्यक्तीला समजलें पाहिजे. याचं कारण सुद्धां हेंच कीं त्यांचें सामायिक वजन आपणांवर नेहमीं पडत असतें व आपल्या हातून बऱ्यावाईट गोष्टी घडत असतात. साहजिकच चांगल्या संगतींत आपणांकडून चांगलीं कृत्यें पार पडतात.

योगी लोक किंवा आज महात्माजींसारखे लोक आपल्या मताप्रमाणें सर्वांना करायला लावतात हें जरी खरें असलें तरी तें अपवाद म्हणून. सर्वसाधारण व्यक्ति हें करूं शकणार नाहीं.

पण ॲन्जेलो पॅट्रि* म्हणतात त्या वचनाचा अर्थ जर लक्षांत घेतला तर समाज व व्यक्ति यांचा अन्योन्य संबंध कशा स्वरूपाचा आहे हें लक्षांत येईल. व्यक्तीला समाजाची जरूर आहे, पण ती त्या व्यक्तीच्या अंगीं जे गुण आहेत ते बाहेर आणण्याकरतां, त्यांना योग्य तो वाव देऊन कार्य साधण्याकरतां.

आजच्या लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्याच्या युगामध्यें या वचनाची उपयुक्तता अधिक आहे. जनतेच्या मतसामर्थ्याचा उपयोग निरनिराळे

---

* "We must have the press of the crowd to draw virtue from us."

पक्षनिष्ठ पुढारी वाटेल त्या कार्याकडे करीत असतात. प्रत्येक राष्ट्रांत हा प्रकार थोडाचाफार प्रमाणांत पहायला मिळेल. शौर्य, बुद्धिमत्ता, कलेची आसक्ति, वक्तृत्व इत्यादि अनेक गुण असे आहेत कीं त्यांचा समाजानें नीट उपयोग करून घेतला तर त्या समाजाची–अन् अर्थात् त्या व्यक्तीची सुद्धां–प्रगति अंतीं झपाटयानें झाल्याशिवाय राहाणार नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासांत पोवाडयांचा उपयोग किती झाला, इंग्लंडमध्यें पोप व ड्रायडन् यांच्या तरवारीच्या धारेसारख्या तीव्र लिखाणानें फूट कशी निर्माण केली, फ्रान्समध्यें क्रांतिपूर्व कालीं व्हॉल्टेर, रूसो यांनीं कोणती कामगिरी केली, रशियन क्रांतींत गॉर्कीच्या लिखाणाचें स्थान किती महत्त्वाचें आहे इत्यादि गोष्टींची नोंद इतिहासानें केव्हांच सुवर्णाक्षरांत केली आहे. याच लेखण्या व त्यांतून शाई उतरविणारीं कार्यशील व ध्येयशील मनें समाजाच्या विरुद्ध बाजूच्या दारानें अंकित केलीं असतीं तर–?

त्यावर विचारच करायला नको. व्यक्तित्व–विकास व समाज-विकास हीं भिन्न नाहींत हें खरं. समाजाच्या दाबाचा वा शक्तीचा व्यक्तीच्या गुणविकासाकडे उपयोग होत असला तरच बरें !

## अधिक अभ्यास

**(१) "समाज श्रेष्ठ कीं व्यक्ति श्रेष्ठ ?" यावर वादविवाद करा.**

**(२) शौर्य, बुद्धिमत्ता, कलेची आसक्ति व वक्तृत्व या गुणांचा उपयोग समाजाच्या प्रगतीकरतां कसा करतां येईल ? उदाहरणें देऊन स्पष्ट करा.**

**(३) 'तरवारीच्या धारेसारखें तीव्र लिखाण' म्हणजे काय ? मराठी वाङमयांत असे लेखक कोण आहेत ? त्यांच्या लेखनांतून असे उतारे लिहून घ्या.**

२.७३६

२८

# लोकशाही अयशस्वी कां ?

राजेशाहीचा व हुकुमशाहीचा खूप अनुभव घेतल्यानंतर मानव-जातीनें लोकशाहीचा पुरस्कार करायला सुरवात केली. राजा असलाच तर त्याचं जीवन बहुतांशीं लोकमतावर अवलंबून राहायला लागलं. एकाच्याच अनियंत्रित सत्तेमुळें जे बरेचसे अत्याचार होत होते, अनेक व्यक्तींची जी अन्नान्न स्थिति होत होती ती आतां जाईल अशी सर्वांना उमेद होती.

परंतु राजेशाहीनंतर आलेली लोकशाही ही मूठभर निवडक लोकांची सत्ता होती. तो लोकशाहीचा एक आभास होता. लोकसभेंतील प्रति-निधींना लोकांच्या बिकट प्रश्नांचा कित्येक प्रसंगीं मागमूसही माहित नसायचा किंवा तो माहीत करून घेण्याचा त्यांना विचारसुद्धां करून घ्यावासा वाटेना. राजेशाहीचीच ही सुधारलेली आवृत्ति होती, मग लोकांच्या अडचणींचा येथें योग्य विचार कसा होऊं शकेल ? यांतच यांत्रिक युगाची भर पडली. शेत करणारे लोक कमी झाले व त्यांतले पुष्कळसे लोक गिरणीमजूर झाले; इतर राष्ट्रांशीं व्यापार वाढूं लागला; देशांत तयार झालेल्या मालाला हक्काच्या बाजारपेठांची जरूरी भासूं लागली; साम्राज्यतृष्णा प्रत्येक व्यापारी राष्ट्राच्या ठिकाणीं डोकावूं लागली. राजेशाहींत सुरू असलेली छळणूक निराळ्या स्वरूपांत सुरू झाली. यांतूनच एक विशिष्ट प्रकारची हुकुमशाही निर्माण झाली.

हें सर्व सांगायचं कारण असं कीं लोकशाही येऊन सुद्धां पुन्हां समाजा-पुढें तेच तेच बिकट प्रश्न येऊन उभे राहिले. चांगल्या चांगल्या लोकांची दिशाभूल झाली व लोकशाहीसुद्धां अयशस्वी आहे; समाजाचे प्रश्न सोडविण्यास लोकशाही अपुरी पडूं लागली असा एकच ध्वनि सगळीकडे निघाला.

पण लोकशाहीचा पुरस्कार करणारे सुद्धां कांहीं कमी नाहींत. त्यांनीं एकंदर समाजस्थितीचा पूर्ण, सखोल विचार केला अन् *हचिन्स-सारख्या गृहस्थांनीं सांगितलं कीं लोकशाही अयशस्वी झाली नसून जनतेपुढें जे नवनवीन प्रश्न उत्पन्न झाले ते मानवी बुद्धीला सोडवितां आले नाहींत इतकंच.

माझ्या मतें खरं आहे त्यांचं म्हणणं. लोकशाहीला अत्यंत जरूर असलेल्या गोष्टी समाजांत प्रसृत करणं जरूर असूनही तिकडे मुद्दामच लक्ष दिलं नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य, जीवन सुखी करण्यास लागणाऱ्या जास्तींत जास्त सुखसोयी सर्वच व्यक्तींना सारख्या प्रमाणांत देणें, व्यक्ति-व्यक्तींतच काय पण राष्ट्राराष्ट्रांत व धर्माधर्मांत जी कमालीची सहिष्णुता यायला पाहिजे ती, इत्यादि अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष झालें नि लोकशाहीच्या वृक्षाला राजेशाहीचींच कटुफळं आलीं तर त्यांत आश्चर्य कसलें ? मानवी बुद्धीनें या सर्व प्रश्नांचा नीट उलगडा केला नि मार्ग शोधला तर लोकशाही केव्हांच अपुरी पडणार नाहीं—अयशस्वी होणार नाहीं.

## अधिक अभ्यास

**(१) राजेशाही, हुकुमशाही, लोकशाही इत्यादि शब्दांचा अर्थ समजावून द्या. आणि नंतर एकमेकांतील भेद स्पष्ट करण्याकरतां एक परिच्छेद तयार करा.**

**(२) लोकशाही अयशस्वी होण्याचें कोणतें कारण या निबंधांत दिलें आहे ? तें खरें आहे काय ? कां ?**

**(३) हिंदुस्थानांत लोकशाही असावी कीं हुकुमशाही यावर वादविवाद करा.**

---

*"Democracy has not failed, the intelligence of the race has failed before the problems the race has raised."

२९

# हा खरा धर्म

'आमचा परमपवित्र हिंदुधर्म' किंवा 'मेरा दिलसे भी प्यारा इस्लाम' असलीं वचनं त्या त्या धर्मानुयायांच्या कानीं पडलीं तर त्यांच्या सर्व शरीरांतून झटकन् अशी एक लहर येऊन जाते कीं त्यामुळे सर्व शरीरच पुलकित व्हावें; अन् यांत अस्वाभाविक असं कांहींच नाहीं. ज्या धर्माची पकड आपणांवर अनेक पिढ्यांपासून बसली आहे, ज्या धर्मानें आपलं जीवन योग्य मार्गाला लावण्याची पराकाष्ठा केली, जो धर्म आपल्यांतल्या अत्यंत स्वार्थत्यागी व गाढ तत्त्वज्ञांनीं प्रस्थापित केला असल्याची आपली खात्री आहे, त्या धर्माच्या नांवांत महात्म्य निर्माण झाल्यास आश्चर्य असं कांहींच नाहीं.

पण होतं काय कीं हा पवित्र, व्यापक, नि उदात्त पाया विसरला जातो नि धर्माला खूप निराळाच विचित्र अर्थ लावला जातो. हिंदु धर्माच व्यापक व उदात्त स्वरूप सांगतांना सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं मोट मार्मिक वाक्य वापरलं आहे. ते म्हणतात--"जगांतील आत्मानुभवी लोकांचा–मग ते हिंदु असोत, ख्रिश्चन असोत वा मुसलमान असोत–एक बंधुसमाजच असून त्यांच्यांत एक प्रकारचें कौटुंबिक सादृश्य ठळकपणें दिसून येतें." किती तंतोतंत बरोबर आहे त्यांचं म्हणणं, नाहीं? महात्माजी म्हणतात,* "मानवांना एकमेकांपासून दूर सारण्याकरतां धर्म नाहीं; त्यांना एकत्रित आणण्याकरतां." ईश्वरानें मोझेसला काय सांगितलं होतं माहीत आहे? "Thou hast come to this earth to unite; thou hast not come to this earth to separate." मोझेसला लाभलेला संदेश किती मोलाचा आहे! पण ख्रिस्तानुयायांनीं त्याच्या अर्थाची खूप ओढाताण केली अन् ठरवलं कीं धर्म जगभर पसरविण्याचा संदेश आपण यांतून घेतला पाहिजे. त्याकरतां

---

* "Religious are not for separating man from one another, they are meant to bind them."

त्यांनीं अनेक मार्ग स्वीकारले. त्याला प्रत्युत्तर म्हणून इतर धर्मांच्या लोकांनीं पण आपले मार्ग बदलले. मुसलमान लोकांनींसुद्धां अशीच विचित्र प्रकारची धर्मश्रद्धा प्रकट केली अन् मग या ध्येयानें प्रेरित होऊन ते जिथं जिथं गेले तिथं तिथं त्यांनीं दोन पक्ष मात्र कायमचे निर्माण करून ठेवले.

धर्माच्या मूळ उद्देशाचं किती हिडिस विडंबन हें! कोणत्याहि धर्माचीं मूलतत्त्वें सत्य व प्रेम यांवरच आधारलीं आहेत. हें जर खरं तर असं वैमनस्य कां निर्माण व्हावं? याचं उत्तर देणं फारसं कठीण नाहीं. वैमनस्य निर्माण होणं हा जो परिणाम दिसून येतो तो त्या कालच्या आचार, विचार व उच्चार यांच्यामुळें. या तिहींनींच मुख्यतः संस्कृति बनत असते. D. H. Lawrence या प्रख्यात कादंबरीकारानें एके ठिकाणीं म्हटलं आहे "Culture has its roots in the deep dung of cash." कटु सत्य आहे हें. धर्म काय किंवा संस्कृति काय-यांत या पैशांमुळें, लोभामुळें फरक पडत जातात; भांडण, लढाया होत जातात अन् एक दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ ठरून जेत्याची संस्कृति खूप धुडगूस घालते. खरा धर्म या प्रकाराला आळा घालून एकी घडवून आणील-पण असा धर्म ओळखणारे राष्ट्रांत बोटांवर मोजण्याइतके तरी सांपडतील कां?

## अधिक अभ्यास

**(१) सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचें "हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें" हें पुस्तक अभ्यासा.**

**(२) "कोणत्याहि धर्माचीं मूलतत्त्वं सत्य व प्रेम यांवरच आधारलीं आहेत." याच्या स्पष्टीकरणार्थ निरनिराळ्या धर्मग्रंथांतून उक्ती गोळा करा. सर्व धर्मांचे ग्रंथ मराठींत उपलब्ध आहेत.**

**(३) श्री. कोकजे शास्त्री हे धर्माच्या बाबतींत परिवर्तनवादी आहेत. 'परिवर्तनवादी' म्हणजे काय हें समजावून द्या किंवा त्यांच्या ग्रंथांतून त्यासंबंधीं माहिती मिळवा.**

३०

# वाङ्मयाचें ध्येय

मराठी वाङ्मय थोडंफार जाणणारांना डॉ. पटवर्धन ऊर्फ माधव ज्युलियन निदान ऐकून तरी माहीत असतीलच. "मराठी असे आमुची मायबोली" व "तिला बैसवूं वैभवाच्या शिरीं" असा भाषाभिमान असणाऱ्या अत्यंत थोड्या व्यक्तींपैकीं माधवराव एक होते. हा त्यांचा अभिमान जागृत ठेवणें आपलें काम आहे. हें आपणांला कसें काय साधणार? याला एक सोपा मार्ग आहे. आपल्या मराठी वाङ्मयाचा नेहमीं उत्कर्ष होत राहील असं वाङ्मयीन ध्येय आपणांसमोर असायला पाहिजे.

वाङ्मयीन ध्येय म्हटल्याबरोबर कांहीं टीकाकार नाकें मुरडतात. ते म्हणतात, वाङ्मय ही कला आहे. कलेला हेतु नसतो; कलेला निश्चित असं ध्येय ठेवण्याची जरुरी नाहीं; आणि अशी सक्ति जर एखाद्या लेखकावर केली तर त्याचे हातून उत्तम कलाकृती उतरणें बरेंच कठीण जाईल. अनेक बंधनें घातलीं तर कोणतंच कार्य सुकर होणार नाहीं हें खरं आहे पण वाङ्मयकृतीच्या बाबतींत अशी सक्ति कधींच नसते; कारण—

लेखक स्वतःच बंधनें आपणावर लादून घेत असतो. सामाजिक जीवनांतल्या निरनिराळ्या प्रसंगांनीं लेखकाच्या मनांतले उदात्त भाव जागृत होतात व त्यावरच तो कल्पनारम्य चित्रे उभारतो व त्यामुळें उदात्त प्रसंगाचें वर्णन करण्याचें बंधन अभिजात लेखकाला बंधन वाटतच नाहीं. यापेक्षांही एक निराळें बंधन लेखकांवर घालायला पाहिजे. रडवं वाङ्मय वाचकांना रडवील, त्यांचीं मनं हळुवार करून टाकील व पुढील कार्याला त्यांच्यांत जोम राहणार नाहीं. वाङ्मयाचं कार्य याच्या अगदीं उलट आहे. आधुनिक युगाचे एकमेव प्रतिनिधि गॉर्की* म्हणतात—वाङ्मयाला एक जाणीव पूर्ण

---

* "Literature must understand that its role is to stimulate still greater energy."

असायला पाहिजे अन् ती म्हणजे वाङ्मयानें सर्वांचा उत्साह नेहमीं वाढवीत राहिलें पाहिजे.

कोणालाही त्यांचं म्हणणं पटेल. वाङ्मय हें केव्हांही वाचकांकरतांच आहे. जें वाङ्मय वाचकाला निःसत्व, नेभळा आणि निराश करील असं वाङ्मय समाजाच्या हिताला मोठाच बाध आणणारं असतं. वाङ्मय-भक्तांनीं याचा जरूर विचार केला पाहिजे. अन्यायाची चीड येऊन बंडाला उद्युक्त करणारं युयुत्सु वाङ्मय निर्माण करणं म्हणजेच हें ध्येय पाळणं असा मात्र याचा अर्थ नाहीं. मानवाच्या प्रगतिपरतेची प्रत्येक वाचकाला जाणीव व्हावी, यशाबद्दल त्याला आशा वाटावी, ती सफल करून घेण्यास लागणारा जोम त्याला लाभावा व इतरांचं अहित न करतां आपण अधिक उत्साहानें नेहमींच पुढें जात राहूं असा विश्वास त्यांच्यांत उत्पन्न व्हावा हीच नेहमीं वाङ्मयाची मनीषा असावी.

## अधिक अभ्यास

**(१) वाङ्मयाचा सशास्त्र अभ्यास तुम्हांला करावयाचा असेल तर पुढील पुस्तकें प्रथम वाचा--**

**सारस्वतसमीक्षा--श्री. य. र. आगाशे**
**काव्यालोचन--श्री. प्रा. द. के. केळकर**
**प्रतिभासाधन--प्रा. ना. सी. फडके**
**वाङ्मयविहार--प्रा. ना. सी. फडके**
**माझे आवडते लेखक--श्री. ग. माडखोलकर**

**(२) 'ध्येयवादी वाङ्मय' यावर एक टांचण तयार करा. याकरतां प्रतिभेचा पहिला खास अंक, श्री. साने गुरुजींचें 'धडपडणारीं मुलें भाग १ ला" व श्री. वि. स. खांडेकर यांचें 'माझीं सहा भाषणें' हीं पुस्तकें अभ्यासा.**

**(३) 'कोणत्याहि लेखनाला हेतु असावा काय?' यावर वादविवाद करा. याकरतां श्री. न. चिं. केळकर यांनीं बडोदें साहित्यसंमेलनांत केलेलें भाषण वाचा.**

३१

# सत्याची सापेक्षता--

आपण जरा चोहोंबाजूला दृष्टि टाकली तर असें दिसून येईल कीं लहान मुलांपासून तों मोठ्या माणसांपर्यंत प्रत्येकाला आपण म्हणतों तेंच सत्य आहे, बरोबर आहे व दुसऱ्यांनीं सांगितलेलें सत्य असलें तरी तें थोडेसें तरी कमी प्रतीचें आहे असं नेहमीं वाटत असतें. एक मात्र खरं कीं कांहीं कांहीं प्रसंगीं त्याला त्याच्या वचनाची लायकी समजून येते.

याचं मूळ शोधणं फारसं कठीण नाहीं. या भूतलावर जितक्या व्यक्ति आहेत तितक्याच प्रकृति आहेत असं अनेक विचारवंतांचं मत आहे. अर्थात् या भिन्न प्रकृतींच्या लोकांचीं मतं भिन्न भिन्न असणें अगदीं अपरिहार्य आहे. हें सर्वच बाबतींत असूं शकतें असं मात्र नाहीं.

इतकी भिन्नता असतांनासुद्धां समाज कसा टिकूं शकतो ? असा प्रश्न तुम्ही विचाराल. त्यांना एकत्रित ठेवण्याकरतां साम, दाम, दंड इत्यादि अनेक मार्ग आहेत; ते अवलंबिले जातातच; अन् कोणत्या तरी प्रकारें समाजनियम पाळावे लागतात.

पण समाज योग्य रीतीनें चालावा, भिन्न मतांना पूर्ण वाव देऊनहि अयोग्य वर्तन कोणाकडून घडूं नये व समाजाची घडी नीट बसावी, याकरतां जर कोणत्या एका तत्त्वाची जरूरी असेल तर ती म्हणजे 'प्रत्येक गोष्टीला तौलनिक दृष्ट्या स्थान--योग्यता--लाभते' या तत्त्वाची. आपलं सांगणं जरी सत्य असलं तरी तें कधीं काळीं खोटं ठरण्याचा संभव आहे व दुसऱ्या कोणाचं तरी तत्त्वप्रतिपादन अधिक सत्य आहे असं ठरूं शकेल ही प्रत्येकानें खात्री बाळगावी. महात्मा गांधींना तर आज सत्याची मूर्ति समजतात. त्यांनीं समाजापासून आपली वैयक्तिक गोष्टसुद्धां लपवून ठेवलेली नाहीं. प्रत्येक प्रश्नाचं सत्य शोधन करून तो निर्भीडपणें समाजासमोर मांडायची हा त्यांचा नित्य क्रम होऊन बसला आहे. अशा थोर

व्यक्तींनीं तरी या बाबतींत काय सांगितलं आहे ? ते म्हणतात* आपण मानव अपरिपक्व आहोंत नि अशा लोकांनीं सांगितलेलं वा प्रतिपादलेलं सत्य हें नेहमीं सापेक्षत्वानेंच मानणें जरूर आहे. नेहमीं सत्यशोधन व सत्यप्रतिपादन करणाऱ्या व्यक्तीला आपल्या अपूर्णत्वाची जाणीव व्हावी हें केव्हांही योग्यच आहे. अशा व्यक्तींचीं वचनं आपणासारख्या अपूर्णत्व जाणणारांनीं तरी जरूर लक्षांत घ्यावीं व नंतर पुन्हां एकदां सभोंवार दृष्टि टाकावी म्हणजे सहज दृष्टीस पडेल कीं समाजांतील बहुतेक तंटे या तत्त्वाची संपूर्ण समज नसल्यामुळेंच होत आहेत म्हणून.

एकाद्या व्यक्तीचा मताभिनिवेश, पूर्वींपासून चालत आलेलीं मतं मांडतांना त्यानें दुसऱ्यास दिलेलीं शेलकीं विशेषणें, त्यांच्या मतांचा केलेला अनादर हीं पाहिलीं म्हणजे वाटतें कीं ज्यांना हें जग उगाच वेड्यांत काढतें–अन् त्याचं कारण काय तर त्यांचे सारेच मित्र असतात म्हणून––त्याच व्यक्ती सत्य जाणणाऱ्या, समाजाची घडी बसविणाऱ्या असतात हें खास समजावं. कालाप्रमाणें व्यक्तित्व-विकास व त्याचा योग्य परिणाम म्हणजे त्या कालांतील समाजधारणा हें सत्य.

## अधिक अभ्यास

**(१) सत्याकरतां ज्यांनीं हालअपेष्टा सहन केल्या आहेत अशा व्यक्ती कोणत्या ? त्यांनीं केलेलें सत्यप्रतिपादन तुमच्या शद्बांत लिहा.**

**(२) ‘व्यावहारिक सत्य’ हें निर्भेळ सत्यापेक्षां निराळें असतें असें कांहीं अनुभवी लोक सांगतात. याबाबत अशा लोकांशीं चर्चा करा.**

**(३) “सत्य हाच धर्म” यावर एक छोटेंसें भाषण तयार करा. पुढील मुद्यांचा उपयोग करा––**

**मानवाचें रोजचें जीवन––विचारांची देवाणघेवाण––स्वभावदोष––सत्यकथनाची शक्याशक्यता––“सत्यं वद !”––सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात् ! ––असत्य कथनामुळें फायदे-तोटे––सत्याच्या मर्यादा––सत्याचा विजय––तोच धर्म कां ?**

---

* “All truth represented by imperfect humans that we are is relative.”

३२

# युद्धाची फलश्रुति

आपण ज्या पृथ्वीवर वास्तव्य करून आहोंत त्या पृथ्वीवर मानवानें गट करून रहायला सुरवात केल्यापासूनच लढाया व छोट्या चकमकी यांचा मानवी जीवनांत शिरकाव झाला. आपलं स्वतःचं वैशिष्टय दाखविणें; दुसऱ्यावर आपण सत्ता गाजवूं शकतों याचं प्रदर्शन करणें; प्रसंगीं आपल्या सुखाकरतां दुसऱ्यांना दुःख देणं या ज्या मानवी सुधारणेच्या प्राथमिक अवस्था सहजासहजीं निर्माण झाल्या यांतूनच पुढें चकमकी, लढाया व आजचीं मोठमोठीं युध्दं या सर्वांचा उगम झाला आहे.

क्वचित् कालीं व्यक्तिसुखाच्या ऐवजीं एका जमातीचं अथवा राष्ट्राचं हें असुरी सुख असणं संभवनीय आहे. एका जमातीनं वा राष्ट्रानं दुसऱ्यांवर स्वारी करणं व त्यांना आपल्या अमलाखालीं आणून आपण त्या गुलामांचे सुलतान होणं ही भावना या युद्धांच्या मुळाशीं असते असं आजच्या सर्व मोठमोठ्या राजकीय तत्त्वज्ञान्यांचं मत आहे.

पण–हें खरोखरचं सुख असतें काय ? असल्यास तें चिरकालिन असणं संभवनीय आहे का ? त्याला चिरकालत्व द्यायचं असेल तर त्या राष्ट्रानें अथवा व्यक्तीनें काय करायला पाहिजे ?

या सर्व प्रश्नांचीं उत्तरं एका वाक्यांत देतां येतील–सैन्य, शस्त्रास्त्रं नेहमीं वाढत्या प्रमाणावर ठेवावीं व युद्धाला नेहमीं सिद्ध असावें. याच तत्त्वावर आज प्रत्येक राष्ट्र युद्धाची जय्यत तयारी ठेवण्याची शिकस्त करीत आहे; जणूं कांहीं असं केलं कीं खरोखरच सर्वांना सुख लाभणार आहे ! या सर्व मदांध राष्ट्रांनीं युद्धानंतरच्या परिस्थितीकडे कधीं लक्ष दिलं आहे कां ?

जर्मनीसारखं संशोधक राष्ट्र गेल्या महायुद्धानें पार रसातळाला मिळवलं अन् पुन्हा तयार झालं तें सुद्धां हुकुमशाही पुकारून पुन्हां जागतिक

युद्धाला ! त्यांना त्यांच्याच घरची म्हण* पटू नये हें आश्चर्य नाहीं कां ? युद्धापूर्वीचीं मोठमोठीं सैन्यं नाश होऊन त्यांच्या जागीं नि:शक्त, रडवे नि चोर यांच्याच फौजा तग धरून उभ्या असतात. राष्ट्राची एक जोरकस पिढी कापली जाते; शहरं उध्वस्त होतात; अनेक उत्तम उत्तम गोष्टी नाश पावतात; अन् सर्वांचा एकमेव परिणाम होतो तो कोणता ? तर विजयतृष्णा मात्र सारखी वाढत जाते.

हा प्रकारच सारा अमानुष आहे. नेपोलियनसारख्या युद्धवेड्या व्यक्तीनं सुद्धां अनुभवांतीं काय म्हटलं माहीत आहे ना ? तो म्हणतो, "War is the business of barbarians." खरं आहे त्याचं म्हणणं. रानटीपणाच नाहीं का हा ?

आज जर्मन सर्वाधिकारी हिटलर यांना असं सांगायचा प्रसंग आला आहे--कोणाचं जरी नाहीं तरी आपल्या पूर्वजांनीं जें रूढ करून ठेवलं आहे तेवढं तरी एखाद्या सुपुत्रासारखं ध्यानीं घ्याल का ?

## अधिक अभ्यास

(१) पुढील विषयांवर वादविवाद करा--

जागतिक युद्ध कायमचें थांबविणें शक्य आहे काय ?

राष्ट्राच्या प्रगतीकरतां युद्धाची आवश्यकता आहे काय ?

याकरतां चर्चिल, हिटलर, प्रे. रूझवेल्ट यांचीं युद्धविषयक भाषणें व डॉ. श्री. रा. पोतनीस यांचें 'उद्यांचें जग' हें पुस्तक वाचा.

(२) "War is the business of barbarians." हें नेपोलियनचें म्हणणें उदाहरणांनीं स्पष्ट करा.

(३) "युद्धस्य कथा रम्या !" या विषयावर एक निबंध लिहा.

(४) "मला सेनापति केलें तर—" यावर तुमचे मनोगत विचार दैनंदिनींत लिहून ठेवा.

*"A great war leaves the country with three armies–an army of cripples, an army of mourners and an army of thieves."

३३

# प्रगति—

आपणा सर्वांचें ध्येय जरी एक स्वरूपाचं वाटत असलं तरी प्रत्येकाला आपापल्या मताप्रमाणें आपली स्वतःची प्रगति करून घ्यावीशी वाटते हें खास. अशाच प्रकारें सबंध राष्ट्र, किंबहुना मानव जात सुद्धां, सांगत असते कीं आपण अत्यंत प्रगतीपर आहोंत म्हणून.

निसर्ग-चमत्कार, अनेक नवीन प्रकारचीं यंत्रें, सामाजिक बंधनांची उलथापालथ यांचे कार्यकारणभाव चर्चून, शोधून काढून व त्यांतून आपापल्या कुवतीप्रमाणें मार्गदर्शन करून मानवानें आपली प्रगतीपरता निदर्शनास आणून दिली आहे. बैलगाड्या जाऊन आज अग्निरथ वा विमानें आलींत, लामणदिवे जाऊन खूप प्रकाश देणारे विजेचे दिवे घरोघर होतील अशी परिस्थिति झाली, किंवा मी म्हणतों कीं चार्ली चाप्लीननें आपल्या 'Modern Times' या चित्रपटांत दाखविल्याप्रमाणें मानव संपूर्णतया यंत्राच्या आधीन झाला व त्याला निसर्गावर मुळींच अवलंबून राहावें लागलें नाहीं तरी ही प्रगति त्या ठिकाणीं थांबेलच असें नाहीं; त्याच्याहि पुढें जावें, सबंध खगोल पालथा घालावा अशी महत्त्वाकांक्षा निर्माण होणं कांहीं अशक्य नाहीं. आपल्या सुखसोयींत अधिक भर कशी घालतां येईल, आपलें बुद्धिवैभव कसें प्रदर्शित करतां येईल व आपल्या युगाचें वर्चस्व अधिक कालपर्यंत कसें टिकेल इत्यादि कल्पना मानवाला कधीं स्वस्थ बसूं देणार नाहींत, अन् या अशा तीव्र गरजेमुळेंच अनेक नवनवीन शोध लागत आहेत.

हीं सर्व कृत्यें 'प्रगति' या सदरांत मोडतात. पण आपण जर बारकाईनें या प्रगतीच निरीक्षण केलं तर सहज दिसून येईल कीं ही निवळ वरपांगीं कल्हई आहे. खरी मूलतः होणारी प्रगति यांत नाहींच. कित्येक राष्ट्रांतून औद्योगिक युग येऊन बरींच वर्षें झालीं आहेत. या राष्ट्रांचे पूर्वीचे उपासमारीचे, शिस्तीचे व वैयक्तिक जबाबदारीचे प्रश्न सुटले आहेत असं हमखास कोणालाच म्हणतां येणार नाहीं. हॅवेलॉक

एलिस* म्हणतात कीं प्रगति म्हणजे एक त्रासदायक स्थिति जाऊन दुसरी त्रासदायक स्थिति येणं होय.

दिसायला विचित्र, आपल्या प्रगतीची टिंगल करणारी व सहजासहजीं न पटणारी ही उक्ति खरोखरच अत्यंत बरोबर आहे. पशूचा मानव होणं किंवा मानवाचा गुलाम झाला असल्यास पुन्हां मानव होणं याला मी प्रगति म्हणेन. गॉर्कीनें म्हटलं आहे "The new age has come because slaves are turning into men." या पद्धतीची प्रगति आज कुठे आहे ? मानवच मानवाला गुलाम करायला, ठार मारायला तयार झाला आहे. महात्मा गांधी म्हणतात–"Man as an animal is violent, as a spirit non-violent." आज काय किंवा गेलीं कित्येक शतकें काय, मानव युद्धपिपासु होऊन पुन्हां एकदां रानटी व्हायला तयार होतो–मार्ग फार तर निराळा; त्रास देण्याची स्थिति बदललेली; पण प्रगतीच्या नांवानें शून्य ! अशी ही आपली प्रगति आहे, नाहीं ?

## अधिक अभ्यास

(१) "प्राक्कालाची प्रगतिपरता तेवढी मात्र घ्यावी." या कवि Bee च्या उक्तीचा अर्थ स्पष्ट करा.

(२) "नरेंच केला हीन किती नर !" हें एका आंग्ल कव्युक्तीचें भाषांतर आहे. यांतील विधान तुम्हांला पटतें काय ? तुमचें म्हणणें थोडक्यांत लिहून काढा.

(३) 'माझ्या राष्ट्राचे प्रगतीचे मार्ग' या विषयावर पुढील मुद्यांचा उपयोग करून एक छोटेसें भाषण तयार करा--

राष्ट्राची आजची स्थिति--आर्थिक, सामाजिक व राजकीय--देशांतील आजच्या हालचाली--खेडें व शहरें–मार्ग (शिक्षण, ग्रामसुधारणा, शेत, उद्योगधंदे वगैरे)--यशाची अपेक्षा.

(४) 'आधुनिक भारत' हें श्री. जावडेकरांचें पुस्तक वाचा नि त्याचीं टिपणें करा.

* "What we call progress is the exchange of one nuisance for another nuisance."

३४

# क्रांति—

इमर्सन् हे आंग्ल वाङमयांतील एक प्रख्यात निबंधकार होऊन गेले. त्यांचं जीवन दिसायला जरी मोठं चैनीचं नि सुखाचं दिसलं तरी मानव-जातीच्या सुधारणा घडवून आणण्यासाठीं त्यांची लेखणी नेहमीं झिजली आहे.

मानवाच्या प्रगतीबद्दल सांगत असतांना क्रांत्या या कधीं प्रतिगामी नसतात असं त्यांनी* विधान केलं आहे. चारच शब्दांचं वाक्य आहे, पण खूप अर्थ भरला आहे त्यांत. मानवाच्या प्रगतीचा इतिहासच जणूं त्यांतून दिसतो आहे.

क्रांति म्हणजे तरी काय ? क्रांति म्हणजे आमूलाग्र बदल. बदल कशांत ? याचं उत्तर असं कीं जी आजची समाजरचना असेल तींत आमूलाग्र बदल घडून येणें वा घडवून आणणें याला क्रांति म्हणतां येईल.

नंतर प्रश्न असा उद्भवतो कीं असा आमूलाग्र बदल होऊं शकेल काय ? सर्व रचना बदलली म्हणजे सर्व गोष्टी नवीन आल्या असं नसून त्या नवीन स्वरूपांत दिसूं लागल्या इतकंच. असं जर क्रांतीचं स्वरूप असेल तर कोणत्याहि क्रांतींत मानव आपली समाजरचना मुद्दाम वाईट करून घेणार नाहीं. ती रचना नेहमीं प्रगतीपरच राहील.

आपणा मानवांचं जीवन धांवत आहे. या धांवण्याची दिशा समोर आहे. कांहीं प्रसंगीं आपलं जीवन सैरावैरा इतर दिशांना पळतं आहे असा भास होतो पण तो क्षणकालच. दिशा चुकल्याची आंच त्याला लगेच पोहोंचते व तो योग्य तो बदल घडवून आणतो.

बदल होणें हा जगाचा नियम आहे. इतकंच नव्हे तर एका निबंध-कारानें म्हटल्याप्रमाणें तो नेहमीं अत्यंत फलदायी असतो--(Change is always fruitful.)

---

* "Revolutions never go backward."

क्रांति जशी प्रतिगामी नाहीं तशीच ती आपली इच्छा नसतांनाहि घडून आल्याशिवाय रहात नाहीं--हें जर सत्य असेल तर आपणहि रोजच्या व्यवहारांत प्रगतीपरता जाणूनबुजून कां अवलंबूं नयें ? इमर्सननींच म्हटलं आहे--Progress is the activity of today and the assurance of tomorrow." उद्यां काय घडणार याची पावती आपल्या प्रगतिपर उद्योगानें अगाऊच आपल्या हातीं येते. मग क्रांति एकदम कशी येईल व ती प्रतिगामी तरी कशी असेल ?

## अधिक अभ्यास

(१) यंत्रांच्या वाढीमुळें आपल्या जीवनांत बराच फरक पडला, अस कांहीं विचारवंत म्हणतात. तुमच्या स्वतःच्या जीवनांत कोणता फरक पडला याची नोंद करा.

(२) "यंत्र हा मानवजातीला शाप आहे कीं वर ?" या विषयावर वादविवाद करा. महात्मा गांधी, हॅरॉल्ड लास्की, पंडित जवाहरलाल यांची व इतर मोठमोठ्या व्यक्तींचीं मतें गोळा करा. Harijan च्या अंकांत दोन्ही बाजूंची बरीच माहिती मिळेल.

(३) 'Pleasures of Life' हे निबंध वाचा.

३५

# मरणांत खरोखर जग जगतें !

मानवाचं जीवन म्हणजे अनेक सुखदु:खांची, आशा–आकांक्षांची नि यशापयशाची शृंखला आहे. या शृंखलेची गुम्फण नीट झाली तर आयुष्य सुखमय व प्रभावी झाल्याशिवाय राहणार नाहीं.

गुम्फण नीट करायची म्हणजे काय करायचें ? आपली प्रत्येक कृति कोणत्या स्वरूपाची आहे; ती अंगिकारल्यानें स्वत:स त्रास झाला तरी चालेल, पण तो त्रास कांहींतरी उच्च ध्येयाकरतां घेतला जावा व असे अनेक क्षण आपल्या आयुष्यांत यावेत याकरतां धडपड करावी यांतच खरें आपल्या प्रत्येक कृतीचें सार आहे व हीच खरी जीवन–क्षणांची सुन्दर गुम्फण आहे. स्वत:चं सुखसर्वस्व विसरून जाणं, दुसऱ्याकरतां आपण स्वत: त्रास घेणं नि एखाद्या ध्येयाच्यामागे लागून त्याकरतां आपल्या प्रणांचं दान करण हें एक प्रकारचं दिव्य मरण आहे.

मेणबत्ती माहित आहे ना तुम्हांला ? स्वत: झीज सोसून दुसऱ्यांना प्रकाश द्यायला सदैव तयार, हेंच तिचं जीवन-ध्येय. नाजुकशा फुलांचं तरी असंच नाहीं कां ? एक क्षण तरी त्यांनीं आपल्या कार्यांत––सुवासानें सुख देणें––खंड पाडला आहे ? लहानसं बीं ! माणसानं जेव्हां पहिल्यानें तें पेरलं असेल––किंवा पेरलं गेलं असेल म्हणा हवं तर–– तेव्हां त्याचा हा एवढा मोठा वृक्ष फोफावेल अशी कल्पना तरी आली असेल का त्याला ? अन् हें समजल्यावर माणसानं तोच तोच अत्याचार त्या बींवर करायला सुरवात केली तरी त्या बीनें प्रतिकार न करतां मानवाला सुखी करण्याकरतां आपल्या सर्वस्वाचं दान करून वृक्ष तयार करण्याचंच आपलं ध्येय निश्चित केलं नाहीं का ?

असंच मानवी जीवनाचं आहे. कुटुम्ब, समाज, राष्ट्र यांच्या सुखाकरतां अनेक खस्ता खाणं, जनतेची सेवा करतां करतां आपल्या सुखी जीवनावर तिलांजली देणं वगैरे 'अनंत मरणें' आपण आधीं मरायला तयार असलं

पाहिजे. अशा प्रत्येक मरणांतून आपण अधिक जोम मिळवून जिवंत राहूं. यांतूनच आपल्या अनेक आशा पालवल्या म्हणजे मग आपल्या जीवनाला ध्येय प्राप्त होतें. अन् एकदां ध्येयसूर्याचा लख्ख प्रकाश पडला म्हणजे मग आपण कशाचीच पर्वा करीत नाहीं. या ध्येयाकरतां आपण प्राण अर्पण करण्यांतच आपणांला अमरपण येणार आहे.

कविवर्य तांब्यांनीं म्हटलं आहे—

“ मरणांत खरोखर जग जगतें,
अधि मरण अमरपण घे मग तें ”

या वचनांत वरवर दिसणारा विरोध आतां शिल्लक आहे का ? विचित्र वाटणाऱ्या, गूढ भासणाऱ्या या ओळी प्रत्येक व्यक्तीचं जीवनसार बनायला नको का ? तानाजी, बाबू गेन्यू, लोकमान्य टिळक, मॅझिनी, लेनिन यांना लौकिकरीत्या मरण आलं खरं पण त्यांचं मरण समाजाचं मोठ्यांतलं मोठं हित साधतांना आलेलं; राष्ट्राचं स्वातंत्र्य मिळविण्याकरतां त्यांनीं यज्ञ केलेला; आपल्या मायभूमीच्या सुखाकरतां त्यांनीं आपल्या जीवन-पुष्पाची एकएक पाकळी वाहिलेली; मग त्यांना अमरपण कां नाहीं लाभणार ? अन् या अशा मरणांतच खरोखर जग जगत असतं ! मग असं जगणं हेंच नाहीं का जीवन ?

क्र. ६१३५

## अधिक अभ्यास

**(१) मातृभूमीचा गौरव करणाऱ्या कवितांचा संग्रह करा. ‘ माझी मातृभूमि ’ यावर या कवितांचा उपयोग करून एक निबंध लिहा.**

**(२) “ अन् अशा या मरणांतच खरोखर जग जगत असतं ! ” या वाक्याचें स्पष्टीकरण करा.**

**(३) श्री. तांबे हे एक मोठे आशावादी कवि आहेत. त्यांचा काव्यसंग्रह वाचा; निदान पुढील कविता नीट समजावून घ्या:—“घन तमीं शुक्र बघ राज्य करी,” “ घट भरे शिगोशिग भराभरा,” “ रुद्रास आवाहन,” “ मरणांत खरोखर जग जगतें,” “ जन पळभर म्हणतिल ‘ हाय, हाय ’.”**

**या कविता वाचल्यावर “ मला आवडलेली कविता ” या विषयावर एक टांचण तयार करा.**

Marathi Grantha
Sangrahalaya.
Thana

REFBK-0006136